# PROPHETIC REVELATION

# भविष्य-संदेशात्मक प्रकटीकरण



## OUR METAMORPHOSIS

## आमचे रूपांतर

*ज्याला कान आहेत तो ऐको!*

*येशू ख्रिस्त काल, आज व युगानुयुग सारखाच आहे. - इब्री १३:८*

# PROPHETIC*REVELATION

GHIM MOH EST., P. O. Box 333
Republic of Singapore - 912742

MITA(P) 73/1/93 Issue 97 Fourth Quarter 1993

**गरुड आरोळी ठोकते**

*The Eagle screams...*



*...the Dove leads.*

**कबूतर मार्गदर्शन करते**

'अंतिम काळाच्या संदेशात' असणाऱ्या या जगभरातील आणि विशेषकरून सिंगापुरातील विश्वासणाऱ्या बंधूच्या प्रीती व वर्गण्याद्वारा ही पुस्तिका उपलब्ध झाली आहे. हे मराठी भाषांतर (आबा - आग्रीपाडा बायबल बिलीव्हर्स असेम्ब्ली) द्वारा प्रसिद्ध करण्यांत येऊन वाटप केले जात आहे. ह्या पुस्तिकेतील शब्द-माध्यमाद्वारे आपणांस जीवंत प्रकटीकरण प्राप्त व्हावे आणि आपण **सांप्रतसत्यांत** स्थिरावलेले व मुळावलेले आणि मनुष्यांसमोर तुम्ही विश्वासात **प्रभू येशु ख्रिस्ताचे** नाम धारण करणारे व्हावे अशी आमची प्रार्थना आहे.

साठा असेपर्यन्त ह्या पुस्तिकेच्या जादा प्रति विनंतीवरून **ह्या घटकेचा संदेश** जाणून घेण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींना मिळतील.


**ब्र. रिचर्ड डिसोझा**
बी. आय. टी. ब्लॉक १२/६३,७८,
रेब्श स्ट्रीट, आग्रीपाडा,
मुंबई - ४०० ०११.
(दूरध्वनी : ३०१ ४९ ८६)

*... आपण प्रौढतेप्रत जाण्याचा नेटाने प्रयत्न करुं या. - इब्री ६:१,२;*

This brochure cannot be sold or used in any way for the soliciting of funds.

संदेश वाहक : ब्र. रिचर्ड एल. एस. गॅन
अनुवादक : ब्र. पी. जी. भालेराव

# गौरवापासून गौरवात



**हे** फार मोठ्या अपेक्षेचे युग आहे. मनुष्याचा मार्ग हा भय आणि दुष्ट स्वप्नांनी भरला असला तरी पुष्कळ लोक नंदनवनाचा किंवा सुखलोकाचा शोध करीत असून ते नंदनवन कुठेतरी वळणावरच आहे असे त्यांना वाटते. मनुष्य हा काळज्या चिंतानी व्याप्त असला तरी व त्याच्यासमोर तशी आशा दिसत नसताहि येणारे वर्ष हे अधिक चांगले असेल अशी तो आशा धरतो. होय, नजिकचा भविष्यकाल हा उज्ज्वल असेल अशी पुष्कळ लोकांची अपेक्षा आहे.

ख्रिस्ती जगत् म्हटलेल्या लोकसमूहामध्ये एका विषयाबद्दल नेहमीच एक चर्चा असते. ह्या सरत्या शतकामध्ये ख्रिस्ती लोकांसाठी द्वितीय आगमन लवकर होणार आहे, हीच ती चर्चा. माझी विश्वासधारणा अशी आहे की ख्रिस्ताचे खरे संतजन-निवडलेले-वधू ह्यांनी समजून घेतलेले आहे व पाहिले आहे की, ख्रिस्ताची दुसरी *उपस्थिती* ह्याच शतकात प्रकट झाली आहे. अशावेळी वधू-संतजनांनी जागृत होऊन ह्या घटकेमध्ये प्रभूच्या अधिक निकटवर्ती सहवासात खेचले जाण्याची गरज आहे. धर्मजगताचा देवाच्या योजनेत हेतू असला तरी वधू ही मंडळयांच्या धर्म जगताचा भाग नाही, याची तिला जाणीव होणे अगत्याचे आहे.

आतापर्यन्तच्या सर्व शतकांमध्ये रक्ताद्वारे जन्मलेल्या ख्रिस्ताच्या मंडळीचा जगाकडून नेहमीच छळ होत आला असून तिच्यावर अतिक्रमण करण्यात आले आहे. लवकरच काहीतरी अद्‌भुत घडणार आहे, जेणेकरून तिच्या वेदनातून ती **मुक्त** होणार आहे अशी आत्ताच्या घडीतील जीवंत वधूची फार मोठी अपेक्षा आणि उत्कंठा आहे. **संघटित मंडळीला** वेदनांचा अनुभव कधीच आलेला नाही, कारण

अपवित्र विवाह-संबंधातून जन्म झाल्यामुळे ती जगाचा भाग आहे. विधी-संस्कार, कर्मकांड ह्या दृष्टिकोनातून ती धार्मिक आहे, परंतु ती पवित्र आत्म्याने भरलेली नाही. तरीपण, देव आपणाकडून कशाची अपेक्षा करतो आणि वचनाच्या प्रकाशात चालण्यासाठी त्यांनी वचनात कसे रहावे व रुपांतरासाठी कसे तयार असावे हे समजण्याची संतजनांना नितांत गरज आहे. होय, आपल्या ह्या चालू काळातच एके दिवशी देवाच्या तुतारीचा तो अखेरचा सुस्पष्ट आवाज होईल, *'.... आणि ख्रिस्तामध्ये जे मेलेले आहेत ते पहिल्याने उठतील; मग जीवंत उरलेले आपण त्याजबरोबर प्रभूला सामोरे होण्यासाठी मेघारुढ असे अंतराळात घेतले जाऊ, आणि तसेच सर्वदा प्रभूजवळ राहुं'* (१ थेस्सलनी ४:१६-१७). परंतु तो दिवस उगवेपर्यन्त आपण येशूवर विसंबून राहण्यास शिकण्याची गरज असून गौरवापासून गौरवाकडे वाटचाल करावी यासाठी की आपले त्याच्या प्रतिमेत रुपांतर व्हावे.

ह्या संदेशाकरता आपण निवडलेली प्रतिके अशी आहेत : २ करिंथ ३:१८ व मार्क ९:१-३.

> *'तर आपण सर्व आच्छादन नसलेल्या तोंडाने प्रभूचे गौरव आरशात पाहिल्याप्रमाणे पहात असता, प्रभु जो आत्मा याच्याकडून गौरवापासून गौरवात असे त्याच्या प्रतिरुपात* ***पालटले जातो.'*** *(रमाबाई-भाषांतर)*
> *'आणखी, तो त्यांना म्हणाला, मी तुम्हांला खचित सांगतो की, येथे उभे असणाऱ्यापैकी काही जण असे आहेत की, देवाचे राज्य सामर्थ्यानिशी आलेले दिसेपर्यंत त्यांना मरणाचा अनुभव येणारच नाही.*
> *मग सहा दिवसानंतर येशूने पेत्र, याकोब व योहान यांस आपणाबरोबर एका उंच पर्वतावर एकीकडे नेले; तेथे त्यांच्यादेखत त्याचे* ***रुप पालटले,*** *त्याची वस्त्रे इतकी पांढरी चकचकीत झाली, की तितकी पांढरी करील असा कोणी पृथ्वीवर परीट नाही.'*

सहा दिवसानंतरचा दिवस म्हणजे सातवा दिवस होय. प्रभूने पेत्र, याकोब व योहान यांना बारा शिष्यातून बाहेर बोलावले तेव्हा त्या विशिष्ट दिवशी त्यांना काय अनुभव येणार होता याची त्या तिघांना मुळीच कल्पना नव्हती. साधारण एक आठवड्यापूर्वी येशूने बारा जणांना जे सांगितले होते त्याची त्यांना निःसंशयपणे आठवण झाली असेल, परंतु अशाच इतर प्रसंगी येशूने त्यांना 'राज्य' ह्या बाबीविषयी जे सांगितले होते याबद्दलची शिष्यांच्या व येशूच्या समजुतीमध्ये खूपच तफावत होती. त्यांच्या देवाचा मशिहा ह्या सर्वांच्या हयातीतच दृश्य स्वरुपातील राज्य पुनःस्थापित करणार आहे, अशी सर्व यहुद्यांची विश्वासधारणा होती, अगदी तसेच ह्या शिष्यगणांनाही निःसंशयपणे वाटत होते, म्हणून आपला प्रभू येशू जेव्हा *'सामर्थ्यासह येणाऱ्या देवाच्या राज्याविषयी'* बोलला तेव्हां त्यांच्या मनातील त्या दृश्य स्वरुपातील राज्यावरच त्यांची आशा केंद्रीभूत होती. एवढेच काय, ख्रिस्ताच्या पुनरुत्थानानंतर त्यांच्याबरोबर त्याने जे चाळीस दिवस त्यांच्या सहवासात घालवले त्यावेळीही ते शिष्यगण राज्याबद्दलची तीच आशा उरी बाळगून होते. (वाचा-प्रेषित अध्याय १), तरीपण देवाचा आत्मा मनुष्यांच्या ठायी जे कार्य करणार होता त्या

आध्यात्मिक राज्याबद्दल येशू बोलत होता. त्या घटकेपर्यंत पवित्र आत्मा न देण्यात आल्याकारणाने येशू जे जे बोलला त्याचे त्यांना पूर्णपणे आकलन होऊ शकले नाही.

पेत्र, याकोब व योहान त्या उंच पर्वतावर येशूबरोबर एकांती असतांना त्यांनी त्या अद्‌भुत व आश्चर्यकारक दृष्टांताचा समक्ष अनुभव घेतला. त्यांच्या देखत ख्रिस्ताचे रुपांतर झाले, पर्वतावरचे रुपांतर हेच *'देवाचे पराक्रमाने आलेले राज्य'* होते. सर्वसमर्थ देवाचे आपल्या पुत्रामधील गौरव आणि लवकरच स्थापित होणाऱ्या राज्यांतील देवाच्या आत्म्याचे रुपांतरकारक सामर्थ्य त्या तीन निवडक शिष्यांना प्रकट करण्यात आले होते. आपल्या मृत्युपूर्वी त्या शिष्यांनी जे गौरव समक्ष अनुभवले होते (२ पेत्र १:१६) ते म्हणजे भावी काळात स्थापित होणाऱ्या व त्याच्या लोकांच्या अंतःकरणात देवाचा पवित्र आत्मा अनंतकालिक युगाकरता **जीवनाचे रुपांतर** करणारे जे कार्य करणार होता त्याची पूर्व अनुभूति किंवा अनुभवसिद्ध झलक होती. *'देवाचे राज्य'* हे जरी विश्वासणाऱ्यांच्या ठायी आहे तरी त्या राज्याची पूर्णता आणि वैभव याकरता देवाने **मंडळीची सात युगे** नेमस्त केली आहेत. मंडळीच्या सात युगांचा तो कालावधी म्हणजेच **'कृपेचे युग'** साधारण दोन हजार वर्षांचे आहे. पवित्र शास्त्रात त्यालाच *'स्वर्गाचे राज्य'* अशी संज्ञा आहे. आणि *'देवाचे राज्य'* ख्रिस्ताच्या द्वितीय आगमनामध्ये पूर्णपणे प्रकट होऊन सर्वकाळासाठी स्थापित होईल.

आपण कृपेच्या युगाच्या 'सातव्या दिवसाच्या' अखेरच्या घटकात वावरत आहोत. (पवित्र शास्त्रातील प्रतिके-नमुने व छाया यावर विश्वास न ठेवणारे काही ख्रिस्ती लोक आहेत, हे मला माहीत आहे. परंतु हा संदेश **वचनावर** विश्वास असणाऱ्या खऱ्या अर्थाने भक्ती करणाऱ्यांसाठी आहे) ख्रिस्त येशू त्याच्या विश्वासणाऱ्यांमध्ये मंडळीच्या गेल्या सहा युगांमधून कार्य करीत आलेला आहे, आणि आता हे *मंडळीचे सातवे युग आहे*. जीवंत देवाच्या खऱ्या भक्तजनांसाठी लवकरच जी **एक महान घटना** घडणार आहे त्या घटनेचे साक्षीदार असणारे हेच युग आहे, देवाचा पुत्र आपल्या वैभवाने त्याच्या वधूचे रुपांतर करण्यासाठी येण्याच्या अगदी नजीकचे किंवा त्या महान घटनेपूर्वीचे निकटवर्ती असे हे युग आहे. क्षणांत, निमिषांत् ते रुपांतर किंवा अद्‌भुत बदल घडणार आहे, ख्रिस्तामध्ये मेलेले ते अविनाशी असे जीवंत उठविले जातील. आणि जीवंत संतजन हे अमरत्व परिधान करतील (१ करिंथ १५:५१-५३) आणि तेव्हांच ते पित्याच्या घरात झटपट ओढले जातील. आणि ख्रिस्ताच्या राजासनासमोर आपली पारितोषिके पटकावल्यानंतर व सात वर्षांपर्यंत कोकऱ्याच्या लग्नाच्या त्या भव्य मेजवानीचा पुरेपूर अनुभव घेतल्यानंतर (प्रकटी १९:७-९) आध्यात्मिक आणि गौरवयुक्त असे *'देवाचे राज्य'* करण्यासाठी येशू-राजाबरोबर पुन्हा पृथ्वीतलावर येतील. ***'देवाच्या पुत्रांच्या प्रकट होण्याची'*** ती घटका असेल (रोम ८:१९). गौरवयुक्त असे संतजन हे त्यांच्या खऱ्या आणि पूर्ण गौरवी स्वरुपात जगासमोर सादर केले जातील. ते पुनःस्थापनेचे युग असणार आहे, (मत्तय १९:२८). ज्यामध्ये 'तारलेला' परंतु नवा जन्म न झालेला मानवसमाज देवाच्या पुत्राच्या पवित्र राजदंडाखालील लोहदंडाच्या एक हजार वर्षांच्या राज्याखाली येईल. (मत्तय १९:२८, २५:३४, यशया ११:६-९, प्रकटी २०:१-८)

# प्रार्थना करीत सावधान असा

संपूर्ण जगभर पुष्कळ ख्रिस्ती लोक 'रुपांतराची' प्रतिक्षा करीत आहेत. ते आपल्या शरिरांचा बदल होण्याची वाट पहात आहेत. एकाएकी सर्व ख्रिस्ती लोकांचे रुपांतर होणार आहे असे सर्वत्र (धुमधडाक्यात) शिकवले जात आहे. तरीपण, वस्तुस्थिती अगदी उलट आहे. होणारी महान घटना ही अचानकपणे घडणार नाही. ह्या दृष्टिकोनाचा पाठपुरावा करणारी शास्त्रवचने आहेत. वाचा : १ थेस्सलनी ४:१३-५:९ आणि २ थेस्सलनी २:१-५ तसेच आपण ख्रिस्ती आहोत असा दावा करणाऱ्या प्रत्येकाचे रुपांतर होणार नाही. त्याचप्रमाणे आपल्या दैनंदिन जीवनात प्रार्थनामय असे सावध जीवन जगून, जागृत (सावधान) नसणारे व ख्रिस्ताबरोबर न चालणारे असे जे तथाकथित ख्रिस्ती लोक, त्यांच्यासाठीहि रुपांतर होणार नाही.

> *''आता अंजिराच्या झाडाचा दाखला घ्या. त्याची डहाळी कोमल होऊन तिला पाने फुटू लागली म्हणजे उन्हाळा जवळच आला आहे असे तुम्ही समजता, तसेच तुम्ही या गोष्टी होतांना पाहाल तेव्हा तो जवळ दाराशी आहे असे समजा. मी तुम्हांस खचित सांगतो की हे सर्व पूर्ण होईपर्यंत ही पिढी नाहीशी होणार नाही, आकाश व पृथ्वी ही नाहीतशी होतील, परंतु माझी वचने नाहीतशी होणारच नाहीत. आणखी त्या दिवसाविषयी व त्या घटकेविषयी कोणाला ठाऊक नाही, स्वर्गातील देवदूतांस नाही, पुत्रालाही नाही, केवळ पित्याला ठाऊक आहे. सावध असा, जागृत राहा, कारण तो समय केव्हा आहे हे तुम्हास ठाऊक नाही. प्रवासात राहाणाऱ्या कोणीएका मनुष्याने आपले घर सोडतांना आपल्या दासांस अधिकार देऊन ज्याचे त्याला काम नेमून द्यावे व द्वारपाळासहि जागे राहावयास आज्ञा करावी, त्याप्रमाणे हे आहे. यास्तव जागे राहा, कारण घरधनी केव्हा येतो, संध्याकाळी, मध्यरात्री, कोंबडा अरवण्याच्यावेळी किंवा सकाळी, हे तुम्हास ठाऊक नाही, नाहीतर तो अकस्मात् येऊन तुम्हांस झोपेत असतांना पाहिल, जे मी तुम्हांस सांगतो ते सर्वांस सांगतो. जागृत राहा.*
> 
> \- मार्क १३:२८-३७

परंतु सावध असा, जागृत राहा (प्रार्थना करा) म्हणजे नेमके काय? एकादा आकाशाकडे दृष्टि लावून प्रार्थना करीत आहे व तसे करीत असतांना वस्त्रासारखे गुंडाळले जाऊन कांहीतरी चिन्ह दिसेल, असा याचा अर्थ आहे कां? मुळीच नाही.

सावध असा म्हणजे निरीक्षण करण्यासाठी व अभ्यास करण्यासाठी अतिदक्ष रहा. प्रार्थना करणे म्हणजे मध्यस्थी आणि उपासना किंवा भक्ति करणे. आणि हे सर्व आत्म्यात आणि वचनात चालत असतांना साध्य होऊ शकते. १ थेस्सलनी ५:६-११ ही वचने वाचू या.

> *'यावरून आपण इतरांसारखी झोप घेऊ नये, तर जागे व सावध राहावे झोप घेणारे रात्री झोप घेतात, आणि झिंगणारे रात्रीचे झिंगतात, परंतु जे आपण दिवसाचे आहो त्या आपण सावध असावे, विश्वास व प्रीति हे उरस्त्राण व तारणाची आशा हे शिरस्त्राण घालावे, कारण आपल्यावर*

*क्रोध होण्यासाठी नव्हे, तर आपला प्रभु येशू ख्रिस्त याच्या द्वारे आपले तारण व्हावे ह्यासाठी देवाने आपल्याला नेमिले आहे, तो आपणासाठी मरण पावला, यासाठी की आपण जागे असलो किंवा निजलेले असलो तरी आपण त्याजबरोबर जीवंत असावे; यास्तव तुम्ही एकमेकांस बोध करा, व एकमेकांची वृद्धि करा, असे तुम्ही करीतच आहा.'*

पवित्र शास्त्रात जे लिहिले आहे ते वाचणे सोपे आहे, परंतु त्यामध्ये जे लिहिले आहे त्यानुसार वर्तन करणे सोपे नाही. पुष्कळ ख्रिस्ती लोक तथाकथित 'ख्रिस्ती विश्वास' म्हटलेल्या **धर्म-जगतात** गुरफटलेले आहेत. ते भक्तिमंदिरात जाऊन उपासनेला उपस्थित राहातात, दशांश व अर्पणे देतात आणि धार्मिक कार्यक्रमात सहभागी, होतात, परंतु **देवाचे काम** या नावाखाली **देवाच्या वचनाला** फाटा दिला जातो. अन्य भाषेत बोलणे, भविष्य संदेश सांगणे, रोग बरे करणे याबद्दल भरपूर चर्चा आहे. तसेच चिन्ह-चमत्कार आणि इतर पुष्कळ मोठमोठी कामे ह्या पंथाच्या मंडळीत आणि त्या पंथाच्या मंडळीत चालू आहेत, असे वारंवार ऐकण्यात येते. आणि देवाचे वचन पाळण्याबद्दल काय अशी बाब समोर येते तेव्हा ते अभिमानाने छाती फुगवून सांगतात, *'अहो, माझ्या मंडळीने देवासाठी किती मोठे कार्य केले आहे, आम्ही देवासाठी किती मोठा त्याग केला आहे. आणि म्हणून देव आम्हाबरोबर आहेच की....'* (काय ही आत्मवचंना!) हा सर्व प्रकार म्हणजे केवळ **मेणबत्त्या पेटविणे** - स्वसमाधानासाठी धार्मिक कृति, कर्मकांड, संस्कार करणे ह्यात मोडतो. पण प्रत्यक्षात असे करणे म्हणजे आत्म्याची वाणी दुर्लक्षणे व देवाची आज्ञा मोडणे आहे. खरोखरच प्रभूकडून आपला नकार होऊ नये म्हणून यज्ञापेक्षा आज्ञा पालन करणे बरे. (१ शमुवेल १५:२२-२३).

**ख्रिस्ती जगत् हे केवळ शापित नसून शाप असे आहे. ते डाग आणि कलंकांनी भरलेले आहे.** आपले हल्लीचे युग हे सर्वात ढोंगी असे युग आहे. ख्रिस्ताच्या येण्यावर आमचे प्रेम आहे, असे ख्रिस्ती लोक तोंडाने म्हणतात. परंतु ते फक्त ओठाने स्तुति करतात. आणि अशा सर्वांना फार मोठ्या निराशेला सामोरे जावे लागणार आहे. जर ते त्याच्या वचनाच्या प्रकट होण्याचा द्वेष करीत असतील तर ते त्याच्या येण्यावर खरोखर कसे काय प्रेम करु शकतात? म्हणजेच ह्या घडीतील वचनाच्या प्रकट होण्यावर. ~~कसे काय प्रेम करू शकतात?~~ वचन हे (मनुष्याच्या पुत्राच्या विल्यम मेरिअन ब्रॅनहॅमच्याद्वारे) आले असून येशू ख्रिस्त जो मनुष्याचा पुत्र याला त्याने प्रकट केले आहे. **प्रभूच्या ख्रिस्ताच्या** द्वितीय आगमनाची ही सुरूवात आहे. वचनाचे हे आगमन विश्वासणाऱ्यांच्या **तयारी**साठी आहे. जर ते **वचनाच्या** आत्म्याच्या आगमनावर (ख्रिस्तावर) प्रेम करू शकत नाहीत तर ते त्याच्या देहरूप (प्रत्यक्षातील) आगमनावर कसे काय प्रेम करू शकतील? जर ते वचनाला सामोरे जाऊन त्यावर प्रेम करु शकत नाहीत तर मग तो मनुष्य खुद्द वचन आणि तरवार आहे त्याला ते कसे काय तोंड देऊ शकतील? काय ही ढोंगबाजी !

बहुतेक ख्रिस्ती लोक हे **मंडळयांच्या रुढीपरंपरांत** गुरफटलेले व रुतलेले आहेत. इतर कुठलाही विचार न करता ते ***'मंडळीच्या शिकवणुकीवर'*** विश्वास

ठेवतात. *ह्या गोष्टी अशाच आहेत काय, याचा ताळा करण्यासाठी त्यांनी दररोज शास्त्रशोध केलेला नसतो* (प्रेषित १७:११) आम्ही शास्त्र शोधून पहातो असा दावा करणारे त्यांचा अभ्यास फक्त त्यांच्या धार्मिक संघटनांनी पुरस्कृत केलेल्या सिद्धांताच्या चौकटीतच नेहमी मर्यादित ठेवतात. 'आपल्या मंडळीच्या शिकवणुकीशी' सुसंगत राहील अशीच ते वचनाला पुष्कळदा मुरड घालतात. विविध पंथांच्या मंडळ्यांच्या 'शिकवणुकीही' विविध असतात. जो ख्रिस्ती मनुष्य मेथॉडिस्ट मंडळीत सामील होतो त्याला मेथॉडिस्ट पंथाची शिकवण दिली जाते. तसेच अंग्लिकन परंपरेच्या मंडळीत सामील होणाऱ्या ख्रिस्ती व्यक्तिला त्या पंथास अनुरुप अशीच शिकवण दिली जाते. आणि अशाच पद्धतीने विविध व्यक्ती ज्या ज्या पंथीय मंडळीत सामील होतात त्या त्या मंडळीच्या प्रणालीचे शिक्षण त्यांना देण्यात येते. **जोपर्यंत एकादी ख्रिस्ती व्यक्ति गूढ बाबिलोनपासून (कळवंतीण व तिच्या मुलींपासून) आणि तिच्या सर्व सिद्धांतापासून विभक्त होत नाही, तोपर्यंत ती देवाच्या वचनाच्या पूर्ण प्रकाशात येऊ शकत नाही. खऱ्या प्रेषितीय सेवेमध्ये आणि शिकवणीमध्ये चालविले जाण्यास ह्या ख्रिस्ती व्यक्तीने देवाच्या आत्म्याकडे आणि देवाच्या वचनाकडेच पाहिले पाहिजे.** (तुलना - प्रेषित २:४१-४२, इफिस ३:३-५) 'देव प्रकाश आहे आणि त्याच्या ठायी मुळीच अंधार (रुढीपरंपरा-चुकीची शिक्षणप्रणाली) नाही (१ योहान १:५ ब). येशू म्हणाला,

> *'हे लोक ओठांनी माझा सन्मान करितात, परंतु त्यांचे अंतःकरण मजपासून दूर आहे. ते मनुष्यांचे नियम, शास्त्र म्हणून शिकवून माझी निरर्थक भक्ति करितात.'*
>
> \- मत्तय १५:८-९

खेदाने म्हणावे लागते पण एक गोष्ट सत्य आहे की, बहुसंख्य ख्रिस्ती लोक हे फार मोठ्या फसवेगिरीत अडकलेले आहेत. याचाच अर्थ ते फसवीत असून फसवले जात आहेत. ते त्यांच्या धार्मिक जीवनात व धर्मकार्यात एवढे दंग झालेले आहेत की, **देवाच्या सत्याच्या** बाबतीत ते जागृत व प्रार्थनाशील नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. ज्या ठिकाणी उच्चशिक्षित माणसांकडे पवित्र शास्त्राचे गाढे अभ्यासक व शिक्षक म्हणून पाहिले जाते अशा **मुख्य प्रवाहातील धार्मिक संघटनांमध्ये** त्यांचा खूपच विश्वास असतो. हे जे धार्मिक 'प्राध्यापक' आणि ईश्वर-ज्ञान 'पंडित' यांच्यापैकी आपल्या पदव्यांचा त्याग करुन प्रेषित पौलाच्या नम्र जीवनाशी स्पर्धा करण्याची किती जणांची तयारी आहे? संत पौल एकेकाळचा थोर शौल-तो म्हणाला :

> *'जे आपण देवाच्या आत्म्याने सेवा करणारे, ख्रिस्त येशूविषयी अभिमान बाळगणारे व देहावर भरवसा न ठेवणारे, ते आपण सुंता झालेलेच आहो, तरी देहावरहि माझा भरवसा आहे, जर दुसऱ्या कोणाला देहावर भरवसा ठेवावा असे वाटते तर मला अधिक वाटणार. मी तर आठव्या दिवशी सुंता झालेला, इस्त्राएल जातीचा, बन्यामीन वंशाचा, इब्र्यांचा इब्री; नियमशास्त्रदृष्टीने परुशी, आस्थेविषयी म्हणाल तर मंडळीचा छळ करणारा, नियमशास्त्रातील नीतिमत्वाविषयी निर्दोष ठरलेला, असा आहे. तरी ज्या गोष्टी मला लाभाच्या होत्या त्या मी ख्रिस्तामुळे हानीच्या समजलो आहे, इतकेच नाही, तर ख्रिस्त*

## गौरवापासून गौरवात

*येशू माझा प्रभू, याजविषयीच्या ज्ञानाच्या श्रेष्ठत्वामुळे मी सर्व काही हानि असे समजतो, त्याच्यामुळे मी सर्व वस्तूंची हानि सोशिली, आणि त्या केरकचरा अशा लेखितो, यासाठी की मला ख्रिस्त हा लाभ प्राप्त व्हावा.'*

- फिलिप्पे ३ः३-८.

आमेन! आपण मनुष्यांच्या देहावर किंवा आपल्या स्वतःच्या कामगिरीवर भरवसा ठेवू नये. दैहिक बुद्धिमत्ता आणि कुवत हे सर्व केरकचरा आहे. ती सर्व कुत्र्यापुढे फेकलेली घाण आहे. (साध्या भाषेत विष्टेपेक्षा त्याला अधिक कांही म्हणता येणार नाही. विचित्र, नाही का? परंतु सामान्य लोकांना अशाचप्रकारची भाषा समजते.) बरोबर. परंतु येशू ख्रिस्ताकडे मध्यस्थिच्या प्रार्थना सादर करीत असतांना आपण देवाच्या वचनाकडे काळजीपूर्वक लक्ष देऊ व अभ्यासू वृत्ती धारण करु या. कारण आपण आध्यात्मिकदृष्ट्या सावध व जागृत न राहिल्यास ह्या 'शेवटच्या दिवसातील' ख्रिस्ती धर्मांतर्गत फोफावणाऱ्या विपरीत शिक्षण व आचरणरुपी भुरळीमध्ये (भूलथापामध्ये) आपण ओढले जाण्याचा संभव आहे. अंतिम काळामध्ये जे **मोठे विश्वास-पतन** होणार म्हणून पवित्र शास्त्रात भविष्य वर्तवले आहे ते अगोदरच आले आहे व २० व्या शतकाच्या सुरूवातीपासूनच त्याने ख्रिस्ती लोकांमध्ये खळबळ उडवून देण्यास तें कारणीभूत झाले आहे, आणि ह्या अखेरच्या दशकामध्ये अग्रगण्य राजकारणी व धार्मिक पुढारी ह्या पृथ्वीवर शांति आणण्याकरता एका **नव्या जगाच्या प्रणालीचा** प्रस्ताव मांडीत आहेत, त्यांच्यापैकी पुष्कळांना माहित नसले तरी त्यांची ऐक्य योजना ही प्रकटीकरणांत वर्तवलेल्या **एक जग प्रणालीची** परिपूर्ति करीत आहे.

## आत्यंतिक टोकाच्या भूमिका

ख्रिस्ती धर्मजगतामध्ये हल्ली 'काय कांय चालू आहे', याबद्दल मला आपणास थोडेसे सांगू द्या. ज्ञानार्जनाकरता लोक जसे काय ग्रंथ-भक्षण करीत आहेत. कारण ज्ञान ही एक शक्ति आहे अशी त्यांची विश्वासधारणा आहे. जगभर दररोज अगदी हजारोंच्या संख्येने ख्रिस्ती लोकांसाठी ग्रंथांची छपाई चालू आहे. प्रतिवर्षी हजारो नवनवी प्रकाशने प्रसिद्ध होत आहेत. ख्रिस्ती विश्वासातील विविध शाखांच्या मालकीची ख्रिस्ती पुस्तकालये ही विविध विचारसरणीच्या लोकांना वैचारिक खाद्य पुरविण्यात गर्क आहेत, पेंटेकॉस्टल किंवा कॅरिस्मॅटिक पंथियांच्या मालकीच्या ख्रिस्ती पुस्तकालयामध्ये त्या त्या विचारसणींच्या लोकांचे आकर्षण असणाऱ्या अधिक पुस्तकांचा भरणा करण्याकडे कल असतो. त्याला मुक्ततामय साहित्य म्हणता येईल. त्यात आजार, रोग इत्यादीमधून सुटका, आध्यात्मिक क्षेत्रातील संघर्ष आणि अशाच इतर बाबींचा समावेश असतो. उलटपक्षी पवित्र शास्त्रावर भर देऊन सुवार्तेचे समर्थन करणाऱ्या गटाच्या मालकीची पुस्तकालये वर वर्णन केलेल्या पेंटेकॉस्टल-कॅरस्मॅटिक धर्मपद्धतीच्या वाङ्मयाच्या विरोधात साधारण तितक्याच संख्येने पुस्तके साठविण्यात व वितरीत करण्यात रस घेतात.

कॅरिस्मॅटिक किंवा अन्यभाषावादी हे अन्य भाषा बोलण्याच्या बाबतीत आणि कृपेच्या दानांच्या बाबतीत जसे काय वैशिष्ट्य स्थापित करायला पहात असल्याकारणाने

सामान्यपणे त्यांच्याकडे पवित्र शास्त्राच्या सिद्धांताचा तुटवडा जाणवतो. आपल्या व्यक्तिगत जीवनातील अनुभवावर ते खूपच जोर देतात. पेंटेकॉस्टल चळवळीच्या आरंभीच्या काळात ह्या विश्वासप्रणालीचे लोक कांही अंशी अन्यभाषावादावर (कॅरिस्मॅटिक्स) जोर देणाऱ्या लोकांसारखेच होते. परंतु त्या घटकेमध्ये त्यांच्याकडे प्रकाश होता. (आज त्यांनी तो प्रकाश गमावला आहे.) पेंटेकॉस्टल पंथवादी आणि अन्यभाषावादी हे दोन्हाही गट आपला पुष्कळसा वेळ गरजू लोकांसाठी प्रार्थना करण्यात, आरोग्यदानात, अशुद्ध आत्म्यांकडून पीडितांस मुक्त करण्यात खर्च करतात. (अन्यभाषावादी लोकांची एक प्रवृत्ति असते. कोणताहि रोग, दुखणे किंवा पीडा, मग ती साधी वेदना का असेना ह्या प्रत्येकाच्या मागे एक विशिष्ट प्रकारची भूतबाधा असते असा त्यांचा समज असतो.) आणखी कांहीजण स्वतःस इतरांपेक्षा श्रेष्ठ समजतात. कारण 'मुक्तता करण्याच्या सेवेत ते स्वतःला विशेष कुवतयुक्त असे मानतात.' अशा प्रवृत्तीमुळे ते पवित्र शास्त्राचा चुकीचा अर्थ लावणारे म्हणून बळी पडतात. आपल्या अनुभवाच्या संदर्भात देवाच्या वचनाचे 'अति किंवा फाजील नाटकीकरण' करण्याकडे त्यांचा कल असतो. ह्या अनुभवात उघड दृष्टांत होणे, स्वतःभोवती प्रकाश-वलय, किंवा विषारी सर्प हाताळणे अशा बाबींचा समावेश असतो. पुष्कळजण आपल्या अनुभवांना देवाच्या वचनाच्या अधिकाराच्या वरचे स्थान देतात.

सुवार्तेवर भर देणारे पवित्र शास्त्राचे बुद्धिवादी लोक आपणास देवाच्या वचनाचे सखोल ज्ञान असल्याचा अभिमान बाळगतात. आणि त्यांचे पाळकलोक कमीत कमी महाविद्यालयाचे पदवीधर असतात. आणि मग त्यापुढे जाऊन वेगवेगळ्या अभ्यासक्रमात आणि शोध-निबंध लिहिण्यात, शिबिरे भरविण्यात कांही वर्षे घालवल्यानंतर त्यांना आणखी जादा पदव्या व बिरुदे बहाल केली जातात. ते बुद्धिप्रामाण्यवादी असून वाचन-लिखणांचा पाठपुरावा करणे हा त्यांच्या जीवनाचा भाग बनतो. **तरीपण, ते इतके बुद्धिवादी बनतात की त्यामुळे त्यांचा स्वतःलाच कांही फायदा होत नाही.** आपण 'पवित्र शास्त्राचे मूलभूत तत्ववादी' आहोत असा भला ते कितीहि दावा करोत, त्यांचे ते करणे केवळ त्यांच्या मतांगिकाराच्या व तत्वप्रणालीच्या चौकटीतच बंदिस्त असते. पवित्र आत्मा ह्या हल्लीच्या युगाच्या अखेरच्या अंतिम दिवसात जे कांही करीत आहे त्याला ते रद्द करीत आहेत. पेंटेकॉस्टलपंथीय व अन्यभाषावादी चळवळ यांच्याकडे पहाण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाचा गेल्या नऊ दशकातील हा परिणाम आहे. ह्या चळवळीमध्ये ते जे पहातात त्यावर ते 'भावनाप्रधानता' असा शिक्का मारतात कारण ह्या चळवळीमध्ये रोग बरे करण्याच्या सभा, विभूतिपूजा, अतिरंजित (अतिशयोक्त) दृष्टिकोन तसेच पीडा मुक्ततेचे दावे, हातचलाखी, श्रोत्यांना खुबीने धमकावणे अशा बाबी असतात. एवढेच काय शास्त्राच्या संदर्भ क्रमाचे कांही ताळतंत्र न ठेवता दाखवलेला फाजिल उत्साह, सैतान आणि त्याची भूतसेना यावरच लक्ष केंद्रित करणे आणि अखेरीस 'नवी प्रकटीकरणे' अशा सटरफटर बाबींचा त्यामध्ये भरणा असतो.

मित्रहो, इतिहासामध्ये असे एकहि 'धर्मसंजीवन' किंवा 'चळवळ' होऊन गेली नही की, जिच्यामध्ये 'एकांतिक टोकाची भूमिका', 'तशा भूमिका धारण करणारे',

## गौरवापासून गौरवात

'खोटारडे' आणि 'थापाडे' यांचा कलंक नव्हता, परंतु त्याचवेळी त्या धर्मसंजीवनामध्ये व चळवळीमध्ये 'सत्य' आणि 'खरे उपासक' हेहि होते. याचा अर्थ खोटारडे, थापाडे व अत्यंतिक टोकाची भूमिका घेणाऱ्यांमुळे पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवणाऱ्यांनी ह्या चळवळीतील प्रत्येकालाच दोषी धरु नये. टबातील पाण्याबरोबर बाळालाहि फेकून देण्याचा अविचार करु नये !

तथाकथित पवित्रशास्त्र-मूलतत्ववाद्यांना 'नव्या प्रकटीकरणांचे' भय वाटते. कारण ती प्रकटीकरणे त्यांच्या मतांगिकारांच्या व तत्वांच्या यादीत नसतात. ती 'प्रकटीकरणे' पचवायला किंवा आत्मसात करायला त्यांना जड जाते याचे कारण ती फारच विचित्र वाटतात, पुष्कळशी 'प्रकटीकरणे' ही पवित्र शास्त्राला सोडून असतात व कांही तर चक्क 'सैतानी' असतात हे सत्य आहे. परंतु खरी प्रकटीकरणे ही थोडी असून त्या दोहोंच्या दरम्यान विखुरलेली असतात आणि त्यामुळेच त्यांकडे दुर्लक्ष होण्याचा कल असतो. म्हणून त्या प्रकटीकरणांची शहानिशा करतांना आपणांस थोडे अधिक श्रम घेवून आध्यात्मिक रितीने पारख करता यावी व त्या प्रकटीकरणांची देवाच्या वचनानुसार योग्य रितीने सांगड घालता आली पाहिजे. चूक आणि बरोबर याबद्दलचा एकाद्याचा रुढीपरंपरागत दृष्टिकोन हे त्याचे मोजमाप नाही. पुष्कळसे रुढीपरंपरावादी ख्रिस्ती लोक *संकुचित वृत्तीचे* असतात. ते *उदारमतवादी* अन्यभाषावाद्यांच्या विरोधात असतात. एकूण काय, दोघेहि समान चुकीचे भागीदार! एकाच माळेचे मणी!

तरीपण, पवित्र शास्त्रानुसार असलेली जी थोडी 'नवी प्रकटीकरणे' आहेत त्यांचा काळाच्या ओघात विविध उपदेशकांनी या ना त्या प्रकारे चुकीचा अर्थ लावला, इतका की देवाच्या ज्या खऱ्या मनुष्यांद्वारे 'मूळ प्रकटीकरणे' आली, त्यांच्यावर 'खोटेपणाचा पुरस्कार करणारे' असा दोषारोप करण्यात आला.. अशा गोष्टींबद्दल बोलतांना पवित्र शास्त्राचे मूलतत्ववादी पुढील प्रकारचे विधान पुन्हा पुन्हा चवीने घोळण्यांत धन्यता मानतात : *''ह्या शिकवणुकीची मुळे विसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या अमूक तमुक उपदेशकाच्या विचारसरणीत आहेत.''* जुन्या करारातील संदेष्टयांच्या व नव्या करारातील प्रेषितांच्या 'प्रकटीकरणांच्या' बाबतीत (ज्यांच्या लिखाणाला आपण पवित्र शास्त्र म्हणतो) ते हेच विधान करतील का? पवित्र शास्त्रातील ह्या संदेष्टयांच्या व प्रेषितांच्या 'प्रकटीकरणांचा' कमी अधिक प्रमाणांत चुकीचा अर्थ लावण्यास जे कारणीभूत झाले आहेत, त्यांच्याबाबतीत, वरील विधान करण्याचे ते धाडस करतील का? कोण आहेत बरें ते चुकीचा अर्थ लावणारे? रोमन कॅथॅलिक धर्मपद्धती, प्रॉटेस्टंट धर्मपद्धती आणि त्याच मालिकेतील प्रत्येक पंथीय गट व उपपंथ हे ते होत.

## वचनाशी एक

आज ख्रिस्ती धर्मविश्वासाचे कितीतरी तुकडे पडले आहेत. आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या प्रार्थनेच्या परिपूर्तिसाठी, मंडळ्यांना एका छत्राखाली आणण्याकरता सर्व तऱ्हेच्या प्रयत्नांची शिकस्त केली जात आहे.

*'मी त्यांच्यासाठी स्वतःला अर्पून पवित्र करितो, यासाठी की त्यांनीही खरे खरे पवित्र व्हावे. मी त्यांच्यासाठी केवळ नाही, तर त्यांच्या वचनावरुन जे मजवर विश्वास ठेवितात त्यांच्यासाठीहि विनंती करितो, यासाठी की त्या सर्वांनी एक व्हावे; हे पित्या, जसा तू मजमध्ये व मी तुजमध्ये तसे त्यांनीहि आम्हामध्ये व्हावे, यासाठी की तू मला पाठविले असा विश्वास जगाने धरावा. तू जे गौरव मला दिले आहे ते मी त्यांस दिले आहे, यासाठी की जसे आपण एक आहो तसे त्यांनीहि एक व्हावे.''*

योहान १७:१९-२२.

अर्थात ही कांही सोपी कामगिरी नाही. दैहिक दृष्टिकोनातून 'एकता' म्हणजे 'ऐक्य' **परंतु, प्रभूची 'एकता' म्हणजे त्याच्या वचनाशी एकता-त्याच्याशी एकता!** *'प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता, आणि शब्द देव होता.* (योहान १:१) **शब्द आणि देव हे एक आहेत.** दोन नव्हत. ती एकता म्हणजे देव ख्रिस्तामध्ये (अभिषिक्त शब्द) आणि ख्रिस्त देवामध्ये. म्हणून, ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांनी **एक** असण्यासाठी त्यांनी **वचनाशी** सुद्धा **एक** असले पाहिजे.



**शब्द ही तरवार आहे.** म्हणून विविध २००० मंडळयांमध्ये (अंतिम काळाच्या संदेशाच्या मंडळयांचा सुद्धा त्यात समावेश आला) वचनाशी तडजोड केल्याशिवाय 'एकता' होणे शक्यच नाही, हे समजायला कांही कठीण नाही. **सत्य आणि चूक किंवा खोटेपणा यांना तरवार विभक्त करते.** ज्यांना वचनाची जाणीव आहे ते तरवार टाकून देणार नाहीत. परंतु ते अंदाधुंदी आणि गोंधळ यांना छेदून पुढे जातील. आणि लोकांच्यामध्ये ऐक्यप्रवृत्ती आणण्यासाठी सैतानाच्या जादूगिरीमध्ये कुठलाच सहभाग घेणार नाहीत. आणखी असे की, वचनाची जाणीव असणाऱ्या पवित्र-शास्त्र विश्वासणाऱ्यांनी जे त्यांच्या तंबूत नाहीत त्यांच्याबाबत परुशी व शास्त्री लोकांसारखी मनोवृत्ती धारण करु नये. प्रीति आणि समजूतदारपणा याशिवाय मोठा आवाज करणाऱ्या झांजासारखेच ते आहेत. ह्याबाबतीत अनेकजण उणे ठरुन अनुत्तीर्ण झाले आहेत. कारण ते फक्त आपल्या स्वकीयांवरच प्रेम करतात. आणि ते असे का करतात ते समजून घेणे अवघड नाही. दैहिकता ही त्यांच्या रक्तात भिनलेली असून ते गर्वाने फुगलेले असतात. आणि दैहिकता हे मरण आहे.

आता देवाने भूतकालीन युगात जे कांही केले होते, तेणेकरून आपण पवित्र आत्म्याच्या कार्याचे मूल्यमापन करु शकत नाही. देवाने जे कांही केले होते तेवढ्यापुरताच देवाचा मार्ग मर्यादित नाही. यशया ४८:६ मध्ये त्याने जाहीर केले की, 'तू हे

*ऐकले आहे, हे सर्व पाहा; तुम्हाला हे कबूल करावयाला नको काय? आतापासून मी नव्या गोष्टी, गुप्त गोष्टी, तुला माहित नाहीत अशा गोष्टी तुला ऐकवितो'* (तसेच यशाया ४३ :१९) हे वचन सुद्धा वाचा) होय, नव्या गोष्टी गुप्त गोष्टी! देव आजहि जीवंत असून तो अधिक अद्‌भुत गोष्टी करील. अंतिम काळाबद्दलच्या त्याच्या भविष्यवाण्यांची परिपूर्ती होत आहे आणि ह्या युगाकरता असणाऱ्या त्याच्या गुप्त गोष्टी ह्या त्याच्या निवडलेल्या लोकांस त्यांच्या रुपांतरासाठी तयार करण्याकरिता खोलून दाखवल्या जात आहेत.

आपल्या पिढीतील देवाची अभिवचने व कार्ये यावर जर आपण विश्वास ठेवू शकत नाही तर मग आम्ही कनान देश ताब्यात घेण्यास समर्थ नाही असे जे इस्त्राएलाच्या संतानाला वाटले होते त्यांच्याप्रमाणेच आपली गत होईल. त्या दहा हेरांच्या प्रतिकूल वार्तेकडे ज्यांनी लक्ष लावले आणि त्यामुळे त्यांचा देवाने जसा न्याय केला तशाचप्रकारे तो आपलाहि न्याय करील, या बाबीवर विश्वास ठेवणे जड आहे का? देव त्याच्या स्वतःच्या वचनाविरुद्ध जात नाही. 'मी म्हणालो, तुम्ही देव आहां, तुम्ही सर्व परात्पराचे पुत्र आहा. तरी मर्त्य मानवांप्रमाणे तुम्ही मराल.' (स्तोत्र ८२:६-७ अ) ह्या घडीकरता असणाऱ्या देवाच्या वचनाचा तुम्ही धिक्कार केला तर तुमचेहि तसेच होईल.

*'प्रभूचे मन असे कोणी ओळखले की त्याने त्याला शिकवावे? आपल्याला तर ख्रिस्ताचे मन आहे.'* (१ करिंथ २:१६) तर मग अशा रितीने ख्रिस्त शिका.

## बोलावलेले आणि निवडलेले

आता बारा शिष्यापैकी पेत्र, याकोब व योहान हे फक्त तीनच आपल्या प्रभू येशूचे निवडलेले शिष्य होते. अर्थात इतरहि शिष्य होतेच. परंतु बारा जण हे प्रभूने *विशेष रितीने* विडलेले होते. ते त्याच्यापासून शिकले आणि त्याच्या सेवेमध्ये तो जेथे जेथे गेला तेथे तेथे बहुतांश वेळा ते त्याच्या मागे गेले. तरी पण, त्याच्या रुपांतराचे साक्षी म्हणून त्याने फक्त पेत्र, याकोब व योहान यानाच बरोबर घेतले. बाकीचे लायक नव्हते का? यावर तुम्ही विचार करा.

आता पुष्कळ जणांनी ख्रिस्ताची शिकवण व उपदेश ऐकले होते. पुष्कळजण बरे झाले व त्यांनी देवाच्या पुत्रावर विश्वास ठेवला. त्यावेळी कित्येक हजार लोक 'ख्रिस्ताचे शिष्य' होते असे म्हटले तर धाडसाचे किंवा अनाठायी ठरणार नाही. परंतु प्रभूच्या वचनाशी त्यांचे नाते कसे होते? ख्रिस्ताच्या शिकवणीतील त्याच्या कांही मागण्या अगदी जहाल आहेत असे त्यांना वाटले त्याचा त्यांनी स्वीकार केला का? सभास्थानातील त्यांच्या शब्बाथ शाळेत ते शिकले होते त्याच्याशी ख्रिस्ताची शिकवण विरोधी होती हे निश्चित. तरीपण, आपल्या प्रभूच्या संदेश हा नेहमीच प्रतिसादाची मागणी करतो. तो **शब्द** आहे. आणि निवडलेल्या बाराजणांविषयी काय? त्यांच्यापैकी सुद्धा एकजण सैतान नव्हता कां? (योहान ६:७०)

मार्क ४ व मत्तय १३ ह्या दोन अध्यायांचा काळजीपूर्वक अभ्यास करा.

येशूच्या सेवेच्या ह्या टप्प्यात, (त्याच्या सेवाकालाच्या दुसऱ्या वर्षाची अखेर) त्याने वचनाच्या सार्वजनिक शिकवणीऐवजी आपल्या शिष्यांबरोबरच्या खाजगी (व्यक्तिगत) शिकवणीला सुरूवात केली, का बरे? ते देवाचे पूर्वज्ञान होते, असा माझा विश्वास आहे. सर्वांनी शुभवर्तमानाच्या विश्वासाकडे यावे व सर्वांचे तारण व्हावे अशी जरी देवाची सामान्य इच्छा होती तरी सर्वांकडे तो विश्वास नाही. येशू वचनाचा उपदेश करीत असतांना हजारो लोकांनी ऐकले होते. परंतु त्यावर ठाम श्रद्धा ठेवणारा (स्वीकार करणारा) विश्वास फक्त थोडक्यांजवळ होता. बाकीच्यांना समजले नाही आणि म्हणून विश्वास ठेवण्यास आणि वळण्यास ते कमी पडले किंवा अपेशी ठरले.

देवाला व्यक्तिची अंतःकरणे पृथ्वीच्या स्थापनेपूर्वीच ज्ञात होती. यशया ६६:२ मध्ये प्रभू म्हणतो, *'ह्या सर्व वस्तु माझ्याच हाताने बनलेल्या आहेत, त्या अशाप्रकारे झाल्या आहेत; पण जो दीन व भग्नहृदय आहे व माझी वचने ऐकून कंपायमान होतो, त्याजकडे मी पहातो.'* जो अंतःकरणात किंवा हृदयात नम्र आणि आत्म्यांत भग्न असून मनापासून त्याचा शोध करतो त्याला प्रभूच्या दृष्टीने कृपाप्रसाद प्राप्त होईल. लहान मुले जशी कुठलेही आढेवेढे न घेता व वाद न घालता विश्वास ठेवतात तद्वतच अशी व्यक्ति निर्विवादपणे आपल्या अंतःकरणात देवाच्या वचनाचा स्वीकार करेल. अशाच व्यक्तिला **'सत्य ऐकणारे कान'** असतात. सर्वसामान्यांपासून ते सत्य गुप्त असते. *''ते कदाचित सतत शोधणारे पण कधीच आकलन न होणारे, सर्वदा ऐकणारे पण कधीच न समजणारे असे असतील''* (मार्क ४:१२) आमेन. मित्रा, जर तुझे अंतःकरण कठीण असेल तर प्रभूचे सत्य तुला कधीच प्राप्त होणार नाही. वास्तविक पहाता अशा व्यक्तीचे ऐच्छिक व हट्टी अंधपण व बहिरेपण **तिला** प्रभूपासून केवळ दूरच ढकलीत नेईल. लक्षात ठेवा, येशूने हे शब्द उच्चारले, *'हे पित्या, स्वर्गाच्या व पृथ्वीच्या प्रभू, मी तुझे स्तवन करितो, कारण ज्ञानी व विचारवंत यापासून या गोष्टी तू गुप्त ठेवून बालकांस प्रकट केल्या. खरे, हे बापा, कारण असेच तुला योग्य दिसले.'* (मत्तय ११:२५-२६)

आता पेत्र हा **'सर्वात समर्पित'** होता, याकोब हा **'सर्वात कळकळ बाळगणारा'** होता आणि योहान हा **'सर्वात प्रिय'** असा होता. ख्रिस्त, विश्वासणाऱ्यांमध्ये ज्या गुणांची अपेक्षा करीत होता त्या गुणांमुळे ख्रिस्ताने ह्या तिघांना प्रातिनिधीक स्वरूपात वापरले असा माझा विश्वास आहे. **देवाने दिलेल्या वचनाशी** त्यांचे अगदी विशेषप्रकारचे नाते होते. त्या बारा, जणांच्या वर्तुळातच त्यांचे एक अंतरर्वतुळ बनले होते. रुपांतराचे साक्षीदार म्हणून त्या तिघा **शिष्यांची** संख्या निश्चितच अत्यल्प होती. त्याचप्रमाणे आपल्या नीचावस्थेतील शरीरांचे अंतराळात ख्रिस्ताला भेटण्यासाठी अविनाशी शरीरांमध्ये जे रुपांतर होणार आहे त्याचे साक्षीदार व अनुभव घेणाऱ्या विश्वासणाऱ्यांची संख्याही केवळ अत्यल्पच राहणार आहे.

*'फक्त थोड्याच ख्रिस्ती लोकांचे रुपांतर होणार आहे?'* असा तुम्हाला प्रश्न पडेल. होय, अगदी तसेच होणार असा माझा विश्वास आहे. केवळ या उदाहरणांचा विचार करा. नोहाच्या दिवसात तारवात गेलेल्या लोकांची संख्या किती होती?

## गौरवापासून गौरवात

इजिप्तमधून बाहेर आलेल्या त्या प्रचंड लोकसमुदायापैकी यार्देन नदी पार करुन कनान देशात कितीजण गेले? देवदूताने बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाच्या आईवडिलांना भेट दिली तेव्हांपासून ख्रिस्त येशूला यार्देन नदीत अभिषेक करण्यात आला तोपर्यंत ज्यांचे देवाबरोबरचे नाते खरोखरच समर्पित, कळकळीचे आणि प्रीतीचे असे होते अशांची संख्या मोजा, म्हणजेच ख्रिस्ताच्या प्रथम आगमनाचे प्रकटीकरण ज्यांना देण्यात आले होते, असे कितीजण होते?

## स्वप्न

ह्यावेळी १९७५ सालच्या जून महिन्यातील एका रात्री मला जे एक स्वप्न पडले ते येथे कथन करु द्या. रात्रीचा तो दृष्टांत माझ्याप्रत येणेप्रमाणे आला. एक हाक ऐकू आली. मी एक मोठी वाणी बोलतांना ऐकली. 'प्रभु येत आहे! राजा येथे आहे!' मी लगेच त्या वाणीच्या दिशेने धावलो. मी स्वतःला एका पठारावरून पळत असल्याचे पाहिले, त्या पठारावरून पळत असताना मी घसरून पडू नये म्हणून लहान सहान खाचाखळगे व दगडधोंडे चुकवीत होतो. (ख्रिस्ती व्यक्तीचे जीवन हे एक उच्च दर्जाचे पाचारण असून त्याचा मार्ग सैतानाने मांडलेल्या खाचाखळग्यांनी भरलेला आहे) त्या पठाराच्या पलीकडें जाण्यासाठी एक दरी होती. आणि दरीमध्ये पुष्कळ लोक होते. कांही जण त्या पाचारणाच्या दिशेने जात होते. पण ते पळत नव्हते. त्यांना फारशी निकड किंवा त्या बाबीचे महत्व वाटत नसल्याचें दिसले. बहुसंख्य लोक त्यांच्या नित्याच्या कामात गर्क होते किंवा जीवनात कांही ना कांही करण्यात गुंतले होते. मला पुरुष व स्त्रिया त्यांच्या व्यावसायिक पेहरावात दिसले. त्यांचा एकमेकाबरोबर क्रयविक्रय चालू होता, गृहिणी आपल्या कामात दंग होत्या आणि तरुण मुली-मुले त्यांच्या अभ्यासात तल्लीन झालेली दिसली. (त्याचवेळी योएल ३:१४ हे वचन मला आठवले. *'लोकांच्या झुंडी, निर्णयाच्या खोऱ्यात लोकांच्या झुंडी आहेत, कारण निर्णयाच्या खोऱ्यात प्रभूचा दिवस येऊन ठेपला आहे'.*) तरीपण, त्या दरीपलीकडे आणि त्या पठाराच्या दुसऱ्या बाजूला मी पळत होतो. त्याच दिशेने अगदी थोडके (मूठभर) लोक पळत असतांना पाहिले. त्या पाचारणाच्या ठिकाणी मी पोचलो तेव्हा मी माझ्या अगदी पुढेच एक आकृति उभी असलेली पाहिली. त्या प्रखर तेजामुळे मी त्याचे मुख पाहू शकत नव्हतो. मी सरळ त्याच्याकडे धावत जाऊन त्याला मिठी मारली व एक फारच व्यक्तिगत प्रश्न विचारला, *'प्रभू, मी विजय मिळवू शकेन का?'* त्याने उत्तर दिले, *'तू नक्कीच विजय मिळवशील.'*

मी त्याच्यापासून कांही पावले मागे सरलो तेव्हा ख्रिस्ताची आकृति विरळ होत जाऊन अंतर्धान पावली आणि त्याच्या ठिकाणी कोणीतरी एकजण उभा राहिला. तो साधारण छोटासा मनुष्य असून त्याने पाश्चिमात्य पद्धतीचा पेहराव (सूट) घातलेला होता. त्याच्या डोक्याभोवती दृश्य प्रकाशवलय होते. त्यामुळे मला त्याचा चेहरा पाहण्यात अडथळा येत होता. तो ह्या युगाकरता असणारा देवाचा निरोप्या, विल्यम

ब्रॅनहॅम होता. (देवाने ज्याला पाठवले त्याच्या कार्याच्या संदर्भात योहान ६:२८-२९ ही वचने वाचा).

पुढच्याच क्षणी एक स्पष्ट आवाज ऐकू आला, *'रुपांतराची संख्या ही जवळ जवळ पूर्ण झाली आहे!'* मी त्या आवाजाच्या दिशेने वळून विचारले, *'ती संख्या किती आहे?'* त्या वाणीने उत्तर दिले, *'एकशे वीस'*. मी पुन्हा विचारले, *'अजून किती राहिले आहेत?'* उत्तर आले, *'अकरा'*. ते ऐकल्याबरोबर मी माझी आई आणि निकटचे नातेवाईक यांच्या शोधासाठी पळत सुटलो. ते अद्यापि त्यांच्या नित्याच्या जीवनांतील गोष्टींतच गुरफटलेले आढळले.

झोपेतून जागा झाल्यावर मी त्या दोन संख्येबद्दल प्रभूकडे विचारणा करु लागलो, (स्वप्न समजायला अवघड नव्हते). १९९० सालच्या एप्रिल महिन्यात मी फिलिपीईन देशात वचनाची सेवा करीत होतो. त्या महिन्याच्या ७ तारखेपर्यंत प्रभूने मला अर्थ दर्शवला नाही. आणि त्या दोन संख्येचा अर्थ हा आहे. पवित्र शास्त्रातील अंकमूल्यानुसार (संख्यापद्धतीनुसार) १२० हा अंक देवाचा वाट पाहण्याचा नेमस्त केलेला कालावधि दर्शवतो (३x४०). तसेच तो नेमलेल्या समयाचा परिपूर्ण क्रम दर्शवतो (१०x१२). प्रेषितांच्या कृत्यामध्ये माडीवरच्या खोलीत सुमारे १२० विश्वासणारे कैवारी म्हणजेच पवित्र आत्म्याची वाट पहात होते. (प्रेषित १:१५). येशू ख्रिस्ताच्या सेवा कालात तो उपदेश करण्यासाठी आला तेव्हा शुभवर्तमानावर ज्यांनी विश्वास ठेवला त्यापेक्षा विश्वास ठेवणारे कितीतरी अधिक लोक होते, याचे स्मरण करा. दुसरी संख्या - ११ ही १२ या संख्येची तूट दर्शवते. तेणेकडून पूर्ण प्रशासनाचे प्रतिनिधीत्व केले जाते किंवा बोध होतो. कमतरता दर्शवणारा ११ हा अंक प्रभूभोजनाच्यावेळी ख्रिस्ताबरोबर सहभागिता घेतलेल्या ११ .'निवडलेल्या' शिष्यांकडे निर्देश करतो. त्यावेळी यहुदा इस्कार्योत हा त्यांच्यामधून विश्वासघाताची योजना पार पाडण्यासाठी बाहेर गेला होता. हे ११ शिष्य ख्रिस्त जो देहधारी झालेला देवाचा शब्द त्याच्या अगदी निकट असे चालत होते. ते वारंवार त्याच्याशी हितगुज करीत असत. त्यांनी वारंवार जीवनाच्या शब्दासह भोजन केले.

ह्या उलगड्यांवर मला समजून देण्यात आले की, 'रुपांतरासाठी' बोलावलेल्या ख्रिस्ती लोकांची संख्या फार मोठी होती. परंतू ह्या शेवटच्या दिवसातील 'विश्वासापासून होणाऱ्या पतनामुळे' 'फारसे अधिक उरलेले नाहीत' (उरलेल्यांची संख्या जास्त नाही). ज्याप्रमाणे मत्तय २२:१४ हे वचन सिद्ध करते : *'**बोलावलेले** बहुत आहेत, पण **निवडलेले** थोडके आहेत.'* म्हणून पवित्र शास्त्रानुसार असलेले अगदी थोडे टक्के लोक प्रत्यक्षात 'रुपांतरात' जातील, *तेच* ते *निवडलेले* होत. म्हणजेच शुभवर्तमानाचा स्वीकार करावयास तसेच ह्या अंतिम काळासाठी असणाऱ्या देवाच्या प्रकटीकरणाच्या संदेशाचा स्वीकार करावयास '*बोलावलेले* जे पुष्कळजण' आहेत त्यातून *निवडलेले* हे थोडके आहेत.

प्रियजनहो, केवळ वचन ऐकणारे नव्हेत तर वचनाप्रमाणे आचरण करणारेच त्यांत (रुपांतरात) जातील.

## गौरवापासून गौरवात

आता ज्यांच्याकडून वधू बनली जाणार आहे ते 'थोडके' नक्कीच सुदैवी, **धन्यवादित संख्येमधले** आहेत. ते नैसर्गिक मृत्यूला चुकवणारे आणि महासंकट काळातून निसटून जाणारे व देवाचे राज्य सामर्थ्यानिशी आलेले पाहणारे असे असतील. ख्रिस्त जो जीवंत देवाचा शब्द त्याच्याकडे त्यांची अंतःकरणे पूर्णपणे ओढली गेलेली आहेत. जीवंत ख्रिस्ती लोकांमधील ते 'सर्वात समर्पित' 'सर्वात कळकळ असणारे' व 'सर्वात प्रिय' आहेत. त्यांच्यासाठी वचन हे जीवंत आहे. ते ख्रिस्तीधर्मजगतातील रुढीपरंपरेमध्ये चालत नाहीत. **'धार्मिक किंवा धर्म परंपरा हा आध्यात्मिक अंधार'** आहे. एवढेच काय, ते कुठल्याच ख्रिस्ती पंथाच्या विश्वासाला धरुन राहात नाहीत. ते त्यांचे सभासद नाहीत. त्यांची नावे त्यांच्या तथाकथित 'जीवनाचे पुस्तक' म्हटलेल्या नोंदणीपुस्तकात आढळणार नाहीत. कारण त्या बाबींमध्ये देवाच्या आत्म्याची केवळ परवानगीकारक इच्छा वास करते. देवाची परिपूर्ण इच्छा ही धर्मामध्ये व धार्मिक गोष्टींमध्ये नाही. तो प्रकाश आहे आणि तो प्रकाशात वास करितो (१ तिमथ्य ६:१६) *'जो निरोप आम्ही त्याजपासून ऐकला आहे तो तुम्हांस सांगतो, तो हाच की देव प्रकाश आहे, त्याच्या ठायी मुळीच अंधार नाही. त्याच्याबरोबर आपली भागी आहे असे जर आपण म्हणतो आणि अंधारात चालतो तर आपण खोटे बोलतो, सत्याने वागत नाही, पण जसा तो प्रकाशात आहे तसे जर आपण प्रकाशात चालतो, तर आपली एकमेकांबरोबर भागी आहे आणि त्याचा पुत्र येशू याचे रक्त आपल्याला सर्व पापापासून शुद्ध करिते.'* (१ योहान १:५-७) म्हणून जेणेकडून वधू बनते त्यातील 'थोडक्यापैकी' तुम्ही जर एक असाल, तर मग पौल म्हणतो त्यानुसार ख्रिस्ताच्या प्रतिमेत तुमचा बदल होण्यापूर्वी तुमचे वर्तन हे अंगदी वचनाबरहुकूम असेल.

> *'तर आपण सर्व आच्छादन नसलेल्या तोंडाने प्रभूचे गौरव आरशात पाहिल्याप्रमाणे पाहत असता, प्रभु जो आत्मा याच्याकडूनच गौरवापासून गौरवात असे त्याच्या प्रतिरुपात पालटले जातो.'* - २ करिंथ ३:१८
> (रमाबाईंचे भाषांतर)

# मृत्यू आणि 'स्व' ला मरणे

> *'ज्या अर्थी मनुष्यांस एकदाच मरणे व त्यानंतर न्याय होणे नेमून ठेवले आहे.'* - इब्री ९:२७

असे म्टले आहे की, जर मनुष्याचा दोनदा जन्म झाला असेल तर तो केवळ एकदाच मरेल. परंतु जर त्याचा एकदाच जन्म झाला असेल तर त्याला दोनदा मेलेच पाहिजे. हे त्रिवार सत्य आहे. देवाच्या आत्म्याद्वारे मनुष्याचा जर पुन्हा जन्म झाला नाही तर त्याला दुसऱ्या मरणाला तोंड द्यावेच लागेल. तरीपण ह्या अंतिमकाळामध्ये पवित्र शास्त्रानुसार असणाऱ्या लोकांचा असा एक गट असेल की त्यांची शरीरे ही चामडीतील (कबरेतील) किड्यांनी नष्ट केली जाणार नाहीत. (इयोब १९:२६). त्यांना शारीरिक मृत्यूला तोंड द्यावे लागणार नाही. कारण प्रभु येशू ख्रिस्ताच्या आगमनसमयी त्यांचे रुपांतर होईल. जरी ते शारीरिकरित्या मरणार नाहीत तरी त्यांनी

दररोज 'स्व'ला म्हणजेच दैहिक स्वभावाला मेलेच पाहिजे. (तुलना १ करिंथ १५:३१)

दैहिकता ही आध्यात्मिक मनुष्याला सहजगत्या ठार मारु शकते. ती (दैहिकता) मरणास उपजविते (तुलना-रोम ७:५). केवळ त्याच कारणामुळे आपल्या दैहिक स्वभावाला दररोज मेलेच पाहिजे. आध्यात्मिक लोक या नात्याने आपल्या बाह्य मनुष्याचा ताबा घेण्यासाठी आपणांस आपल्याठायी त्या जीवनी आत्म्याची गरज आहे.

*'कारण मला ठाऊक आहे की माझ्याठायी म्हणजे माझ्या देहस्वभावात काही चांगले वसत नाही, इच्छा करणे हे मला होते, पण साधुकर्म करणे होत नाही.'*

- रोम ७:१८

*'जे देहस्वभावाचे आहेत ते दैहिक गोष्टींकडे चित्त लावितात, आणि जे आध्यात्मिक मार्गानुसारी आहेत ते आत्मिक गोष्टींकडे चित्त लावितात. देहाचे चिंतन हे मरण, आत्म्याचे चिंतन हे जीवन व शांति आहे,*

- रोम ८:५-६

*'जर तुम्ही देहस्वभावाप्रमाणे वर्तता तर तुम्ही मराल, परंतु जर तुम्ही आत्म्याने शरीराची कर्मे मारुन टाकिता तर जीवंत राहाल.'*

*- रोम ८:१३*

*'जे देहाधीन आहेत त्यांच्याने देवाला संतुष्ट करवत नाहीं.'* (रोम ८:८) हे निखालस सत्य आहे! हालेलूया! आमेन! प्रेषित पौलाने नाहीका म्हटले, *'मांस व रक्त ह्यांना देवाच्या राज्याचे वतन मिळू शकत नाही, आणि विनाशीपणाला अविनाशीपणाचे वतन मिळत नाही.'* (१ करिंथ १५:५०) पापामुळे रक्त आणि मांस यामध्ये मृत्यू आहे. हेच दुसऱ्या शब्दात असे सांगता येईल. जरी आपण जीवंत आहोत तरी प्रत्यक्षात आपण मरत आहोत. आपले मांस व रक्त सर्पाच्या स्वभावामुळे बिघडून गेलेले-दूषित झालेले आहेत. तो तसा म्हणजे आदामाच्या स्वभावानुसार असल्याकारणाने अनीतीने भरलेला असून मृत्यूच्या छायेखाली वावरत आहे. तो जसे काय जीवंत गटार, घाण आहे. देवाच्या नाकपुड्यांत त्याचा दर्प आहे. तो स्वर्गाच्या राज्याचे वतन प्राप्त करुन घेऊ शकत नाही. *'मांस व रक्त यांस देवाच्या राज्याचे वतन मिळू शकत नाही.'* ह्या विधानाच्या पुष्ठयर्थ आपण लूक २४:३६-३९ ही वचने वाचू या.

*'ते या गोष्टी सांगत असता तो स्वतः त्यांच्यामध्ये उभा राहिला व त्यांस म्हणाला, तुम्हांस शांति असो. तरी ते घाबरुन भयभीत झाले, आणि आपण कोणी आत्मा पाहत आहो असे त्यांस वाटले. त्याने त्यांस म्हटले, तुम्ही कां घाबरला, व तुमच्या मनांत तर्कवितर्क कां उठतात? माझे हातपाय पाहा, मीच तो आहे, मला चाचपून पाहा, जसे मला हाडमांस आहे म्हणून पाहतां तसे आत्म्याला नसते.*

येशूचे मृत्यूमधून आध्यात्मिक शरीरांत पुनरुत्थान झाले. आत्म्यात नाही, कारण *'आत्म्यांना मांस व हाडे नसतात.'* तो (येशू) आध्यात्मिक शरीर असा पुनरुत्थित झाला. ते मांस व हाडे यांचे शरीर होते. पण त्यामध्ये रक्त नव्हते. जर त्यामध्ये रक्त नव्हते तर मग जीवन कोठून येत होते? ते खुद्द जीवनाच्या आत्म्याकडून येत होते. हालेलूया! होलेलूया! (नैसर्गिक रक्त हे नैसर्गिक शरीराला चालविते. लेवीय १७:११,१४ :

आध्यात्मिक जीवनाशी त्याचा **कांही एक** संबंध नसतो) जरी ते हाड व मांस यांचे शरीर होते तरी ते नैसर्गिक शरीर नव्हते. **तें गौरवी शरीर होते. ते पूर्णतया बदललेले शरीर होते. ते दैवी शरीर होते.** म्हणून ते नैसर्गिक किंवा भौतिक जगाच्या त्रिमिती नियमांनी नियंत्रित केले जात नव्हते.

येशू *'पापी देहासारख्या देहाने व पापाकरता आला आणि देहात दंडाज्ञा करुन त्याने पापाचा मोड केला'* (रोम ८:३). होलेलूया ! तो आपल्याशी एकरुप होण्यासाठी आला यासाठी की त्याने आपल्यासाठी मरावे! आमेन! त्याने आपला जीव मरेपर्यंत ओतून दिला आणि त्याने त्याचे रक्त पृथ्वीच्या मातीवर ओतले (कारण तू माती आहेस, आणि तू पुन्हा मातीला मिळशील-उत्पत्ति ३:१९ ब) 'ज्या कोणाची इच्छा असेल' त्याने येऊन त्याच्या जीवनचा उपभोग घ्यावा म्हणून जीवंत पाण्याच्या नदीप्रमाणे त्याचे हे सांडलेले रक्त आहे. आमच्या रक्तात जी दुर्गंधी व जो मृत्यू होता त्यापासून तुम्हाला व मला पूर्णपणे धुवून, साफ व शुद्ध करण्यासाठी तारणाऱ्याने त्याच्या वैभवाचा त्याग करुन त्याच्या रक्तामध्ये जे जीवन होते ते ओतून दिले.

तो निष्पाप होता. त्याचे रक्त शुद्ध होते आणि तुमच्यासाठी व माझ्यासाठी त्याला त्याच्या रक्ताचा प्रत्येक थेंब ओतून द्यावा लागला. का बरे? यासाठी की त्याच्या रक्तामध्ये जीवनाचा जो अनंतकालिक आत्मा होता त्याने आपणास ते अनंतकालिक जीवन द्यावे. प्रभूची स्तुति असो! जीवंत देवाच्या परिवर्तनकारी आत्म्याकडून आमचे आत्मे देवाच्या राज्याचे विभागी होण्यासाठी जीवंत केले आहेत. आपण आता त्याच्या हाडातील हाड आणि मांसातील मांस आहोत. आपण त्याचे शरीर आहोत. आपण त्याची वचन-वधू असून आपणाजवळ जीवनाचा आत्मा आहे. ख्रिस्त आपल्या मनुष्यत्वाचा उद्धार करण्यासाठी आला. त्यामध्ये आत्मा, जीव व शरीर यांचा अंतर्भाव आहे.

> *'कारण त्यांच्या जीवाची खंडणी बहुमोल आहे, म्हणून त्याने सदा जगावे, त्याला कुजण्याचा अनुभव येऊ नये ........'*
>
> स्तोत्र ४९:८-९
>
> *'दावीद त्याजविषयी असे म्हणतो, मी प्रभूला आपणापुढे नित्य पाहिले आहे, मी ढळू नये म्हणून तो माझ्या उजवीकडे आहे, यास्तव माझे हृदय आनंदित व माझी जीभ उल्लासित झाली, आणखी माझा देहहि आशेमध्ये निवास करील, कारण तू माझा जीव अधोलोकांत राहू देणार नाहीस, व आपल्या पवित्र पुरुषाला कुजण्याचा अनुभव येऊं देणार नाहीस.'*
>
> प्रेषित २:२५-२७

हल्ली एकादे दिवशी देवाचे जे निवडलेले लोक आहेत ते अविनाशीपणा धारण करुन आपापल्या कबरांमधून बाहेर येतील. जेव्हां त्यांची स्वर्गीय शरीरे (शब्द शरीरे किंवा थिऑफनी दैवी शरीरे) प्रकट होतील तेव्हा त्यांचे रुपांतर होईल. त्यांना **गौरवी शरीरे** प्राप्त होतील. तसेच जीवंत संतजनही बदलून जातील. जेव्हा त्यांच्या स्वर्गीय शब्द-शरीरांचा म्हणजेच दैवी शरीरांचा त्यांना अचानक स्पर्श होईल तेव्हा त्यांच्या शरीरातील रक्त निघून जाईल आणि त्यांना नवीन **आध्यात्मिक शरीरे** प्राप्त

होतील. १ करिंथ १५:३५-५७ आणि २ करिंथ ५:१-४ ही वचने वाचा.

प्रभूची स्तुति असो! **वधूला मृत्यूला सामोरे जावे लागणार नाही. कारण ती येशू ख्रिस्त जो तिचा वर त्याला समर्पित झालेली आहे. तिच्याजवळ शब्द आहे. ती शब्द वागविते,** म्हणूनच ज्या शरीराजवळ शब्द आहे त्याच्याबद्दल सैतान वाद घालतो. त्याने मोशेच्या शरीराविषयी वाद घातला (यहुदा १:९) त्याने ख्रिस्ताच्या शरीराविषयी वाद केला (मत्तय २२:३१-३२; लूक ४:९; प्रकटी १:१८) तो वचन असणारा कोणाशीही वाद घालील. आमेन. हे निर्विवाद सत्य आहे.

## मन आणि हृदय (अंत:करण)

*'यास्तव बंधुजनहो, मी देवाच्या करुणांमुळे तुम्हांस विनवितो की, तुम्ही आपल्या शरीरांचा जीवंत, पवित्र व देवाला प्रिय असा यज्ञ करावा, ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे. या युगाबरोबर समरुप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रुपांतर होऊ द्या, यासाठी की देवाची जी उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा, ती काय आहे हे समजून घ्यावे.'*

- रोम १२:१-२

*'सर्व मनाने तुला मी शरण आलो आहे;*
*तुझ्या आज्ञांपासून मला बहकूं देऊ नको*
*मी तुझ्याविरुद्ध पाप करु नये म्हणून मी*
*आपल्या मनात तुझे वचन जपून ठेविले आहे.*

- स्तोत्र ११९:१०,११

**मनुष्याचे मन हे सैतानाचे आसन आहे.** मनावर प्रभाव पाडण्यासाठी सैतान बौद्धिक कार्य-कारण भावाचा उपयोग करतो. दैहिक मनुष्य जे पाहू शकतो त्यावरच केवळ विश्वास ठेवतो. त्याला पवित्र वचनाचे काहीच वाटत नाही. जे तो पाहू शकत नाही त्यावर तो विश्वास ठेवू शकत नाही. म्हणून विश्वास ही बाब त्याला कांहीतरी परके आहे असे वाटते.


**मनुष्याचे हृदय (अंत:करण) हे देवाचे आसन किंवा अधिष्ठान आहे.** देव हृदयात (अंत:करणात) राहतो व त्याच्याशी प्रकटीकरणाद्वारे बोलतो. आध्यात्मिक मनुष्य वचन जे सांगते त्यावर विश्वास ठेवतो आणि देवाच्या आत्म्याच्या प्रकटीकरणाद्वारे वचनाचे सत्य जाणतो किंवा समजतो. म्हणून विश्वास हा त्याच्यासाठी प्रकटीकरण आहे.

देवाचे लेकरु हे आपल्या जीवनमार्गात निष्काळजी बनून सैतानाच्या फसव्या परिणामाला आपल्या मनात प्रवेश करु देते, तेव्हा संताच्या अंत:करणाच्या सिंहासनावर असणारा देवाचा आत्मा मनाच्या रणभूमीवर असणाऱ्या दुष्टाबरोबर लढण्यासाठी त्या संताच्या सहाय्यार्थ धाव घेईल, आणि जोपर्यंत तो संत प्रभूच्या आत्म्याच्या निकटवर्ती राहतो आणि त्याच्यावर आपले पोषण करतो, तोपर्यंत ती लढाई नेहमीच जिंकली जाईल. नाहींतर, तो संघर्ष दीर्घकाळचा आणि अनिश्चित (पराभवाच्या छायेतील) असा राहील.

## गौरवापासून गौरवात

वचनाच्या प्रकाशात चला.

**डोळे** हे जीवात्म्याच्या खिडक्या आहेत (इतर ज्ञानेंद्रियांचा विचार धरुन) **मन** हे द्वार आहे. ते कोणत्याही वाईट मोहाला उघडले तर एकाद्याच्या जीवनांवर भूतांचा हल्ला होण्यास ते कारणीभूत ठरते.




इफिस ६:१० शेवटी, प्रभूमध्ये व त्याच्या प्रभावी सामर्थ्याने बलवान् होत जा.

इफिस ६.११ सैतानाच्या डावपेचापुढे तुम्हाला टिकाव धरिता यावा म्हणून देवाची शस्त्रसामग्री धारण करा.

इफिस ६:१२ कारण आपले झगडणें रक्तमांसाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर, सध्यांच्या काळोखातील जगाच्या अधिपतींबरोबर, आकाशांतल्या दुरात्म्यांबरोबर आहे.

इफिस ६:१३ ह्या कारणास्तव तुम्हाला वाईट दिवसांत प्रतिकार करिता यावा व सर्व काही केल्यावर टिकाव धरितां यावा म्हणून देवाची शस्त्रसामग्री घ्या.

इफिस ६:१४ तर मग आपली 'कंबर सत्याने कसा', नीतिमत्वाचे उरस्त्राण धारण करा.'

इफिस ६:१५ शांतीच्या सुवार्तेने लाभलेली सिद्धता पायी चढवा.

इफिस ६:१६ आणि ह्या सर्वांबरोबरच जिच्या योगे त्या दुष्टाचे सगळे जळते बाण तुम्हांला विझविता येतील, ती विश्वासाची ढाल हाती घ्या व उभे राहा.

इफिस ६:१७ 'तारणाचे शिरस्त्राण' व 'आत्म्याची तरवार' म्हणजे 'देवाचे वचन', ही घ्या.

इफिस ६:१८ सर्व प्रकारची प्रार्थना व विनवणी करा, सर्व प्रसंगी आत्म्याच्या प्रेरणेने प्रार्थना करा, आणि ह्या कामी पूर्ण तत्परतेने व सर्व पवित्र जनांसाठी विनवणी करीत जागृत रहा.

जे आपण ख्रिस्त शिकलो आहोत त्या आपणांस प्रेषित पौल इशारा देतो की, आपण आपल्या मनाच्या भ्रष्टतेत चालू नये. कारण आपण अगदी सहजगत्या दुष्कर्मासाठी आपल्या भावना सैतानाच्या स्वाधीन करु शकतो.

> *'यास्तव मी हे म्हणतो व प्रभूमध्ये निश्चितार्थाने सांगतो की विदेशी लोक आपल्या मनाच्या भ्रष्टतेत चालत आहेत. त्याप्रमाणे तुम्ही अतःपर चालू नये; ते बुद्धिसंबंधाने अंधकारमय झालेले आहेत, त्यांच्यातील अज्ञान व त्यांच्या अंतःकरणाचा कठीणपणा यामुळे ते दैवी जीवनाला पारखे झाले आहेत, ते बधीर झाल्यामुळे त्यांनी हावरेपणाने सर्वप्रकारची अशुद्धता करण्यासाठी स्वतःला कामातुरपणाच्या स्वाधीन केले, परंतु तुम्ही अशा रीतीने ख्रिस्त शिकला नाही.'*
> - इफिस ४:१७-२०

## विश्वास

असे कांही ख्रिस्ती लोक आहेत की, ते पवित्र शास्त्रातून वाचलेल्या किंवा ऐकलेल्या प्रत्येक गोष्टीवर प्रकटीकरणाविना (उलगडयाविना) खुशाल विश्वास ठेवतात

व त्यालाच ते 'देवाच्या वचनावरील विश्वास' असे म्हणतात. प्रकटीकरणाविना देवाच्या पवित्र वचनावर विश्वास ठेवण्याला विश्वास असे क्वचितच म्हटले जाऊ शकते. **देवाच्या वचनांतर्गत असणारा खरा विश्वास किंवा देवाच्या वचनात ज्याची पेरणी झालेली आहे (पाळेमुळे आहेत) असा जो खरा विश्वास तो आध्यात्मिक मनुष्याला प्रकटीकरणाचा हंगाम किंवा पीक देईल. परिणामी तो जीवात्मा त्याला जे प्रकट झाले आहे त्यानुसार वर्तन करेल.**

देवापासून प्राप्त होणाऱ्या समजबुद्धिविना असणारा विश्वास हा अनेकजणांना देवाच्या सत्यापासून बहकविण्यास कारणीभूत झालेला आहे. त्याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे मत्तय २८:१९ हे वचन आहे; *'यास्तव तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा; त्यांस पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नामाने बाप्तिस्मा द्या.'* प्रेषित २:३८, १०:४८, १९:५ अनुसार येशू ख्रिस्ताच्या नावातील बाप्तिस्म्याऐवजी पुष्कळांनी नव-विश्वासणाऱ्यांचा बाप्तिस्मा त्रैकशीर्षकात करण्याची गंभीर चूक केलेली आहे व अद्यापिही करीत असून त्यालाच ते विश्वास म्हणतात. ती केवळ **'अंधश्रद्धा'** आहे, कारण खरा विश्वास हा देवाचे प्रकटीकरण व त्याचे वचन ह्या बाबतीत अंध नसतो. एवढेच काय, अंतिम काळाच्या विश्वासातले पुष्कळ लोक या बाबतीत दोषि आहेत. ते ब्रदर विल्यम ब्रॅनहॅमच्या शिकवणीचा शब्दन् शब्द जसाच्या तसा खरा आहे असा विश्वास धरतात. ती शिकवण खरी आहे की नाही हे ते देवाच्या वचनाशी ताडून पहात नाहीत. कारण तसे न करण्याचे त्यांना शिकविण्यात आलेले असते. संदेष्टयाचा न्याय केला जाऊ शकत नाही. असा त्यांचा समज आहे. **देवाच्या प्रकटीकरणाशिवाय देवाचे वचन समजणे व त्याला संतोषविणे अशक्य आहे.**

आता *'विश्वास हा अपेक्षित गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी असा आहे.'* असे पवित्र पुस्तक सांगत नाही का (इब्री. ११:१)? तसेच विश्वासाद्वारे आपणांस समजते की, *'देवाच्या शब्दाने विश्वरचना झाली, अशी की जे दिसते ते दृश्य वस्तूंपासून झाले नाही.'* (इब्री. ११:३) आपणांस विश्वासाने समजते, दृश्य गोष्टींनी नव्हे, पहा? देव *'त्याचा शोध झटून करणाऱ्यांना तो प्रतिफळ देणारा आहे.'* (इब्री. ११:६ ब) *'तुमचे तारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे झाले आहे, आणि हे तुमच्या हातून झाले नाही तर हें देवाचे दान आहे.'* (इफिस २:८) उपासना करणारे त्याला त्यांच्या विश्वासाने संतोषवितात व त्याचे प्रतिफळ म्हणून तो त्यांना प्रकटीकरण बहाल करतो. ते प्रकटीकरण सत्याचे, समजबुद्धीचे, पुरावा इत्यादींचे असते. म्हणून देवाचा विश्वास बाळगा, देवाचे सत्य धारण करा, तो त्याचे वचन पाळण्यात कधीच कसूर करीत नाही.

आमेन! आम्ही निंद्य-मनोभावनांच्या स्वाधीन केलेले नाहीत (तुलना. रोम १:२८) *तर आपल्याला ख्रिस्ताचे मन आहे* (१ करिंथ २:१६ ब) आमच्या विश्वासाच्या बाबतीत आम्ही अंधश्रद्धाळू नाहीत. तसेच आमची समजबुद्धि ही अंधुक झालेली अगर झाकाळलेली नाही. कारण आपल्याला ख्रिस्ताचे जीवन आहे. म्हणून आपण

ख्रिस्त शिकू या. एवढेच नव्हे तर दररोज व्यतित होणाऱ्या दिवसामध्ये आपण त्याच्या विषयी अधिकाधिक शिकू या.


## रुपांतर

आपण आपल्या आरंभीच्या शास्त्रपाठाकडे पुन्हा लक्ष देऊ. *'तर आपण सर्व आच्छादन नसलेल्या तोंडाने प्रभूचे गौरव आरशात पाहिल्याप्रमाणे पाहत असतां, प्रभू जो आत्मा याच्याकडूनच गौरवापासून गौरवात असे त्याच्या प्रतिरुपांत पालटले जातो.'* (२ करिंथ ३:१८). शब्द-वचन-आत्मा आहे आणि ते जीवन आहे (योहान ६:६३ ब) आपण दररोज ख्रिस्ताविषयी शिकत असतांना गौरवाच्या एका अवस्थेमधून दुसऱ्या अवस्थेमध्ये रुपांतरित होत जातो. (येथे मी रुढीपरंपरेच्या वर्गातील ख्रिस्ताबद्दल बोलत नाही तर पवित्र शास्त्रातील **ख्रिस्ताबद्दल** बोलतो. आपण **आत्म्याने** व **खरेपणाने देवाची** उपासना-भक्ति केली पाहिजे) देव 'आजच्यासाठी' जे वचन गाजवत आहे त्याचे आपण सेवन करण्याची गरज आहे, फक्त गत वर्षीच्या मान्याचे सेवन नव्हे. नाहीतर इस्त्राएलाच्या संतानाने केले तसे आपण प्रभूला रागावणे भाग पाडू (इब्री. ३:१५-४:१). म्हणून आपण खुल्या अंतःकरणाने, प्रामाणिक वृत्तीने, आपणाकडे असू शकणाऱ्या कुठल्याही कल्पनेच्या अगर रुढीपरंपरेच्या मागे न दडता देवाच्या वचनाच्या आरशात पहात असलो तर ख्रिस्ताकडून आपण जसजसे शिकू तसतसे देव आपल्याला त्याचे अधिकाधिक प्रकटीकरण देईल असा माझा विश्वास आहे. **वधस्तंभाच्या तारणदायी किंवा उद्धारक सामर्थ्यावर** विश्वास ठेवणे ही एक बाब आहे, परंतु विशेषकरुन ह्या अंतिमकाळामध्ये आपल्या शरीराचे रुपांतर होण्यासाठी (ग्रीक शब्द-**मेटॅमॉर्फू**) देवाच्या **सामर्थ्यानिशी असणाऱ्या वचनाचे** विभागी होणे, ही संपूर्णपणे वेगळी बाब आहे. देवाच्या वचनाच्या आरशांत आपली आध्यात्मिक प्रतिमा निरखून पाहण्याची आपणास लाज वाटू नये. ख्रिस्त त्याची प्रतिमा आपणांस पाहण्यास आपले साह्य करील. ख्रिस्ताच्या पूर्णतेच्या संपूर्ण प्रतिमेत येईपर्यंत तो (खुद्द ख्रिस्त) आपणास त्या प्रतिमेत घडवीत राहिल. प्रभूच्या आत्म्याकडून तो आपणास मान्ना पुरवील - तो मान्ना त्याच्या स्वतःबद्दलचा असून आपल्या आध्यात्मिक वाढीसाठी असेल. आपण प्रत्येकवेळी बारकाईने शोध करीत विश्वासाने त्याच्याकडे येत असतांना व त्याच्याकडील आशिर्वादाची अपेक्षा करीत असतांना आपली तृप्ति होत राहील. तो आपली कधीच निराशा करणार नाही. आम्ही आशिर्वादावर आशिर्वाद प्रकटीकरणावर प्रकटीकरण प्राप्त करु. आणि ते आपणास त्याच्या स्वतःच्या प्रतिमेत घडविण्यासाठी सतत वाढत जाणाऱ्या गौरवाने होत राहील.

**मेटॅमॉर्फोसिस** हा शब्द ''मेटॅमॉर्फू'' ह्या ग्रीक शब्दापासून येतो. आणि त्याच्या अर्थ **'स्व-रुपातील संपूर्ण बदल'** असा आहे. आपल्या शास्त्रपाठातील **'बदलला'** आणि **'रुपांतरीत झाला'** ह्या दोन्ही शब्दांचे भाषांतर ग्रीकमधील 'मेटॅमॉर्फू' ह्या एकाच शब्दाचे आहे. प्रभु आपणांस सांगत आहे की जे आपण देवाचे खरे उपासक ते गौरवाच्या एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत बदलत चाललो आहोत. फुलपाखराच्या जीवन चक्रातील ठळक बदलांप्रमाणे हे होत आहे.

# फुलपाखरु

**फुलपाखरु** जगात जन्म पावते पण ती त्याची खरी सुरूवात नसते. वास्तविक पहाता **'अंड्याच्या कवचात असणारा सूक्ष्म जीव'** अशा स्वरुपात ते असते. ते



सूक्ष्म अंडे एकाद्या पानाच्या खालच्या बाजूस चिकटलेले असते. आईच्या उदरातून बाहेर आल्यानंतरचा त्याचा हा पहिला जन्म असे म्हणता येईल. ते **अंधकारमय जगात** जगत असते. *'पाहा, मी जन्माचाच पापी आहे, माझ्या आईने गर्भधारण केले तेव्हांचाच मी पातकी आहे.'* (स्तोत्र ५१:५ तुलना - रोम ३:२३), परंतु स्वातंत्र्य-जीवन हे तेथून फक्त 'विश्वासरुपी हाकेच्या' अंतरावर असते. त्या अंड्याच्या कवचातून बाहेर येण्यासाठी त्याला वरील प्रकाशाने जीवंत-क्रियाशील करण्याचे अगत्य असते. 'पुन्हा जन्म न झाल्यास' ते त्याच्या बंधनातच मरेल. याचाच अर्थ पापातील व अंधःकारातील हमखास मरण! त्याचप्रमाणे, मनुष्य ह्या जगात जन्मतो तेव्हा त्याच्यांत खरे जीवन नसते. तो अंधःकाराच्या जगात जगत असून पापात मरत आहे.

ज्याप्रमाणे *'लोंढा लोंढ्याला बोलावीत आहे'* आणि *'हरिणी जशी पाण्याच्या प्रवाहांसाठी लुलपते' तसा हे देवा, माझा जीव तुजसाठी लुलपत आहे.'* (स्तोत्र ४२:७,१). म्हणून देवाच्या इच्छेनुसार (करणीनुसार) त्या अंड्याच्या कवचांतर्गत 'जे कांही' असते त्याची इच्छा तीच असते. फुलपाखराचे जीवन म्हणून जर ते नेमस्त झालेले आहे तर फुलपांखरु म्हणूनच ते बाहेर येणे क्रमप्राप्त आहे. फुलपाखरे फुलपाखरांना जन्म देतात. देवाचा पुत्र देवाच्या पुत्रांना जन्मवितो व जगात आणतो. प्रत्येक सजीव प्राणीजात आपल्यासारख्याचं सजीवांना जन्म देतात किंवा उपजवितात. हालेलूया! वाचा-उत्पत्ति १:२१,२४

फुलपाखराचा पुन्हा जन्म होतो तेव्हा अंड्याच्या कवचातून ते फुलपाखरु म्हणून बाहेर येत नाही. तरीपण, ते फुलपाखरुच असते. जग त्याच्याकडे ओबडधोबड, विसविशीत अळी म्हणून पाहील *'काय त्याची आई ही पंखधारी कीटक असून वाऱ्यावर तरंगते ना? मग ह्या अळी-किड्यांचा आपल्या आईवडिलांशी कांहीच सारखेपणा का बरे नाही?'* **बिच्चारा छोटा सुरवंट!** पण तो फुलपांखारुच ना! ह्या किरकोळ छोट्या सुरवंटालाही हा सर्व प्रकार समजत नाही. परंतु त्या अति लहान अशा जीवात खोलवर एक सुप्त समज, एक प्रकटीकरण असते. एके दिवशी आपण आपल्या आईप्रमाणेच हवेत भरारी मारणार आहोत! *'आता 'विश्वास' हा अपेक्षित गोष्टींचा भरवसा व न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी असा आहे.'* (इब्री. ११:१) होय, त्याला हे माहीत असते आणि आणखी काय? ते आंतल्या आंत तळमळत-कण्हत असते. कशासाठी बरे? आपल्या होऊ घातलेल्या **रुपांतरित** शरीराच्या उद्‌घाटनाच्या दिवसाची वाट पाहण्यासाठी (रोम ८:२३) काय ही उपजत बुद्धि! हालेलूया!

## मनसोक्त खाणे, शिकणे, वाढत राहणे

ज्याला आपण फुलपाखराची अळी (सुरवंट) म्हणतो, त्याच्या 'पुनः जन्मण्याच्या' अनुभवाचे निरीक्षण करा. प्रथमतः ते ज्या अंड्यात असते त्या **अंड्याच्या कवचाचा ते फोडून तोडून नाश करते.** - 'त्या **जुन्या मनुष्याला** मारुन टाकते.'

*'आपल्याला असे समजते की, आपले जुने मनुष्यपण त्याजबरोबर वधस्तंभावर खिळले गेले, असे की हे पापमय शरीर नष्ट होऊन आपण पुढे पापाचे दास्य करुं नये, कारण तो मेला, तो पापाला एकदांच मेला, तो जगतो, तो देवाला जागतो. तसे तुम्हीही स्वतःस पापाला मेलेले आणि ख्रिस्त येशूमध्ये देवाला जीवंत झालेले, असे माना.'* (रोम ६:६,१०,११) आमेन!

हा छोटासा सरपटणारा किटाणू आपणांस किती मोठे उदाहरण देतो! *'असे की तुमच्या पूर्वीच्या आचरणासंबंधी जो जुना मनुष्य त्याचा तुम्ही त्याग करावा, तो कपटाच्या वासनांनी युक्त असून त्याचा नाश होणार आहे. तर तुम्ही आपल्या मनोवृत्तीत नवे व्हावे, आणि धार्मिकता व सत्याची पवित्रता यांनी युक्त असा देवानुरुप उत्पन्न केलेला नवा मनुष्या धारण करावा.'* (इफिस ४:२२-२४) होय, 'जुना मनुष्य' मेलाच पाहिजे! **दैहिक मन हे आपल्या सर्व विचारसरणींसह देवाच्या पवित्र वचनांशी फारच नकारात्मक आणि विरोधी असे असते.** त्याचा परिणाम म्हणजे जीवनातील प्रत्येक बाबीकडे नकारात्मक भावनेतून पाहण्याची वृत्ती असते. भावना ह्या फक्त जेव्हा सत्यावर आणि देवाच्या न्यायत्वावर अवलंबून असतात तेव्हांच विश्वासाई असतात. म्हणून आपण आपले मन देवाच्या वचनाने भरण्याची व ते आपल्या अंतःकरणात ठेवण्याची गरज आहे. यासाठी की आपली विचारसरणी आणि भावना ह्या देवाच्या पवित्रतेशी संतुलित असून त्यांचा पूर्ण मेळ असावा. *'तर्कवितर्क व देवज्ञानाविरुद्ध उंच उभारलेले सर्व कांही पाडून टाकून प्रत्येक कल्पना ख्रिस्ताधिन व्हावी म्हणून आम्ही ती बंदिवान करुन नेतो.'* (२ करिंथ १०:५) *ख्रिस्ताने देहरुपे दुःख सोशिले तसेच तुम्हीही तेच मनोवृत्तिरुपी शस्त्र धारण करा, कारण ज्याने देहाने सोशिले आहे तो पापापासून निवृत्त झाला आहे, ह्यासाठी की तुम्ही आपले उरलेले दैहिक आयुष्य मनुष्यांच्या वासनांप्रमाणे नव्हे तर देवाच्या इच्छेप्रमाणे घालवावे. कारण विदेशी लोकांना आवडणारी कर्मे करण्यात, म्हणजे कामासक्ति, विषयवासना, मद्यासक्ति, रंगेलपणा, बदफैली व अमंगळ मूर्तिपूजा यांत राहण्यांत जो काळ गेला तितका पुरे.'* (१ पेत्र ४:१-३)

'जुन्या मनुष्याला' काढून टाकल्यानंतर पुनः जन्म पावलेला तो सुरवंट लगेच **जीवनाच्या कोवळया व रसदार ''हिरव्या'' पानांवर** तुटून पडतो. (तुलना-[illegible] २३:२;५२:८) त्याच्या निर्माणकर्त्याने तरतूद केलेल्या जीवनावर ताव मारण्याचे [illegible]थक रीतीने चालू ठेवतो. त्याच्यामध्ये 'नवजीवन' असल्याकारणाने त्याच्यामध्ये 'नवे' मन आहे. त्याच्या मनोवृत्तीच्या आत्म्याचे नूतनीकरण किंवा नवीकरण झालेले असते. आणि म्हणून आपण सध्या जे आहोत त्यापेक्षा कांहीतरी मोठे होण्याची त्याची इच्छा असते. केवळ सुरवंट अवस्थेत राहण्याचे त्याला नको असते. त्याला




फुलपाखरुं व्हायचे आहे! त्याच्यासाठी **नेमस्त केलेल्या दिवशी** तो (सुरवंट) फुलपाखरु होणारच हे त्याला माहीत असते. परंतु दरम्यानच्या काळात ह्या कीटकरुपी प्राण्याचा बदल होण्याच्या दिशेने चंप.. चंप... चंप.... असा सुप्त आवाज व पर्णरुपी भोजन करण्याचा सपाटा चालूच असतो, जेणेकरुन त्याचा यथावकाश बदल व्हायचा असतो. (उत्पन्नकर्त्यांने त्याच्यासाठी पुरवलेला मान्ना सातत्याने खात असता त्याला त्या चंप.. चंप... चंप 'आवाजाची' व 'खादाडपणाची' लाज वाटत नाही. ह्या सुरवंटाला ते 'हिरवे हिरवे' खाद्य लाभल्यामुळे तो इतका कृतज्ञ असतो की खाता खाता तो मधून मधून आपले डोके स्वर्गाकडे उंचावून आपल्या उत्पन्नकर्त्याची स्तुति करीत असतो.) आपल्या शरीरामध्ये शोषण करीत असलेल्या ह्या हिरव्या अन्नाचे सामर्थ्य त्याच्या शरीरात खोलवर कार्य करीत असते. उघड्या डोळ्यांना ते इतके स्पष्टपणे दिसू शकत नाही. **देव आंतून बाहेर अशा दिशेने कार्य करीत असतो** व 'गौरवापासून गौरवाकडे' त्याचा बदल करीत असतो. 'हिरव्या'मध्ये **जीवन** असते आणि **तुम्ही त्यावर खुशाल किंवा निस्सीमपणे विश्वास ठेवावा!**

आपल्या प्रभु येशूकडे पाहा. तो मूल असतांना शिकत राहिला व आपल्या स्वर्गीय पित्याच्या ज्ञानांत वाढत गेला. 'येशू हा ज्ञानाने, शरीराने आणि देवाच्या व मनुष्याच्या कृपेत वाढत गेला.' (लूक २:५२;२:४० सुद्धा वाचा.) शिकण्यासाठी प्रौढ होण्याची त्याने वाट पाहिली नाही. मुळीच नाही. देवाच्या आत्म्याकडून आपला पुन्हा जन्म होतो आणि आपण देवाची मुले होतो त्याच क्षणापासून आपण देवाचे वचन शिकण्यास व त्यामध्ये चालण्यास शिकायला सुरूवात करावी. पित्याशी आज्ञाधारक राहून येशू शिकला. तो म्हणाला, *'... मी तुम्हास खचीत खचीत सांगतो, पुत्र जे कांही पित्याला करतांना पाहतो त्यांवाचून त्याला स्वतः होऊन कांही करता येत नाही, कारण जे कांही तो करितो ते पुत्रहि तसेच करितो.'* (योहान ५:१९).

*'... आणि मी आपण होऊन कांही करत नाही, तर पित्याने मला शिकवल्याप्रमाणे मी या गोष्टी बोलतो.'* (योहान ८:२८ ब) म्हणून येशूमध्ये आपले संपूर्ण देवत्व देहात ओतून त्याला सामर्थ्ययुक्त करण्यात देवाला संतोष झाला याचे आश्चर्य वाटू नये. (मत्तय ३:१७, १७:५, कलस्सै १:१९) आणि *'तो अदृश्य देवाची प्रतिमा आहे, तो सर्व उत्पतीत ज्येष्ठ आहे.'* (कलस्सै १:१५) आमेन. येशू हा देवाच्या स्वभावाचे तंतोतंत प्रतिनिधीत्व आहे.

तो छोटा सरपटणारा प्राणी दररोज मेजवानीत दंग असतो. जग पाहत असते व निरीक्षण करीत असते. एक गोष्ट मात्र त्यांच्या लक्षात भरते. ती म्हणजे तो प्राणी सतत वाढत असतो! अर्थात 'त्याच्या रोजच्या भाकरीशिवाय' तो सुरवंट वाढणार नाही. ह्या कालावधीत तो बऱ्याच वेळा आपली रंग-रुपे बदलीत राहतो, हे करीत

(कात टाकतो - moults)

असतांना प्रत्येक वेळी तो अधिकाधिक मोठा होत जातो. हालेलूया! होय प्रियांनो, आपण **देवाच्या वचनाच्या जीवनावर** वाढण्याची व **प्रकाशांत** आणि **सत्यात चालण्याची** गरज असून 'तो जुना' मनुष्य फेकून देऊन **दररोज मरण्याची गरज आहे!** तेव्हांच आपल्यात 'कांहीतरी' वाढ होत आहे, आपल्याला 'कांहीतरी' बदल घडवीत आहे हे जगाच्या निदर्शनास येईल. आणि *मग जेव्हा आम्ही गौरवापासून गौरवाकडे बदलत जातो तेव्हा कशाची अपेक्षा करावी हे आपणास समजते. हे कधी शक्य आहे? जर 'आम्ही नवा मनुष्य धारण करु...'* तरच (कलस्सै ३:१०).

जर सुरवंटाला आजुबाजूला खाण्यासाठी **'कोवळी हिरवी पाने आढळली नाहीत** तर त्याची प्रतिक्रिया काय होते, हे तुम्ही कधी बारकाईने पाहिले आहे का? मी पाहिले आहे. तशी पाने शोधण्यासाठी तो सुरवंट अस्वस्थपणे फांदीच्या वर व खालच्या टोकापर्यंत धडपड करीत शोधत राहतो. घाबराघुबरा झालेल्या अवस्थेत तो जसा काय असे म्हणतो, 'मला जर हिरवी-ताजी पाने मिळाली नाहीत तर मी मरेन'. **आता तो सुरवंट कमी कोवळी आणि अर्धवट तजेलदार (निबर) पाने खाऊ शकेल. परंतु वाळून कोळून गेलेली व बेचव पाने तो कधीच खाणार नाही.** प्रभूच्या नावाला गौरव असो! **तसेच ज्यावर त्याचा जन्म झाला नाही अशी दुसरी हिरवी पानेसुद्धा तो कधीच खाणार नाही.** याचाच अर्थ जर त्याचा जन्म कागदी लिंबाच्या पानावर झाला असेल... तर तो सफरचंदाची पाने खाणार नाही, मग भले ती कितीही कोवळी लुसलुशीत असोत. **तद्वतच देवाचे खरे लेकरु त्या घडीमध्ये असणारा 'देवाचा ताजा मान्नाच' खाईल.** देवाच्या अविनाशी बीजापासून त्याचा जन्म झाला असल्याकारणाने त्याच्यामध्ये ते आत्मिक बीज राहते. (१ पेत्र १:२३-२५) आणि जे केवळ वरुन आहे त्याव्यतिरिक्त तो इतर कांहीच खाऊ शकत नाही. (योहान ६) तो वाळलेले निर्जीव अन्न कधीच स्वीकारणार नाही तसेच धर्मप्रणालीतील लोकांचे तथाकथित **'संजीवन-खाद्य' ज्याची वाटप धार्मिक-ख्रिस्ती संघटना करतात त्याचेकडेहि तो ढुंकूनसुद्धा पाहणार नाही.** आमेन! देवाचे खरे मूल आपल्या नैसर्गिक दृष्टिला दिसते ते खाणार नाही तर त्याऐवजी आध्यात्मिक कानांनी जे ऐकेल आणि आत्मिक हातांनी जे हाताळील-जीवनाचा शब्द - तेच त्याचे खरे खाद्य होय. (१ योहान १:१-७)

आपणास असे सांगितले आहे की, *'आळस घोर निद्रेत लोटितो, रिकामा फिरणारा उपाशी मरतो. जो आज्ञा पाळितो तो आपले प्राण रक्षितो, जो आपल्या वर्तनाविषयी बेपर्वा असतो तो मरेल'* (नीति १९:१५-१६ तुलना - २४:३०-३४). संतजनहो, जर त्या फुलपाखरु-अळीची कुठेतरी पडून मरण्याची इच्छा नाही, तर माझीहि नाही. त्या लहान कीटकांत (अळीत) जसे कांहीतरी आहे तसे माझ्या अंतर्यामीहि आहे, जेणेकरुन मला ओरडावेसे, नाचावेसे आणि **देवाच्या वाचनाच्या जीवनात जगावेसे वाटते.** जोपर्यंत दिवस आहे तोपर्यंत आपल्याला कार्य केलेच पाहिजे. आपणावर प्रकाशणाऱ्या प्रकाशात आपण चाललेच पाहिजे. दिवसात काम करणे आणि प्रकाशात चालणे ह्या प्रभूच्या आज्ञा व बोध आहेत. (तुलना - योहान

९:४; ११:९; १२:३५). असे असेल तर अशाप्रकारच्या वेदनांची गरज आहे. सुरवंट-अळीचे निरीक्षण करा. पृथ्वीशी बांधलेल्या ह्या कष्टी शरीराला वेदना भोगण्याच्या अवस्थेमधून गेलेच पाहिजे. हे तिला कळते. पण कोठपर्यंत? संपूर्ण सौंदर्यानिशी तिचे वैभव प्रकट होण्याच्या समयापर्यंत, प्रभूची स्तुति असो! पौल आणि पेत्र ह्या प्रेषितांनी बोध केला आहे :

> *'आमची अशी उत्कंठा आहे की तुम्हापैकी प्रत्येकाने आशेची पूर्ण खातरी करून घेण्यासाठी तशीच आस्था शेवटपर्यंत बाळगावी, म्हणजे तुम्ही आळशी होणार नाही, तर जे विश्वासाने व धीराने वचनांची फळे वारशाने उपभोगणारे होतात त्यांचे अनुकारी व्हाल.'*
>
> - इब्री. ६:११-१२
>
> *'आणि आपला प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त याच्या कृपेत व ज्ञानात वाढा...'*
>
> - २ पेत्र ३:१८

एका गीताचा गोषवारा असा आहे. *'हे जग माझे घर नाही. मी फक्त येथून प्रवास करणारा एक प्रवासी किंवा मुसाफिर आहे.'* आपण स्वर्गीय लोक असून आपणांस ते ठाऊक आहे. कारण आपले अंतरात्मे सुटकेसाठी व बदल होण्यासाठी कण्हत व आक्रोश करीत आहेत - रुपांतराची मार्गप्रतीक्षा करीत आहेत! हालेलूया! आता आम्ही पृथ्वीशी बांधलेले आहोत, पण अगदी नजिक असणाऱ्या एके दिवशी आम्ही उड्डाण करणार आहोत. *'आणि येथूनपुढे हे जग माझे घर आहे, असे मला वाटत नाही.'* आमेन. तरीपण, दरम्यानच्या काळात आम्हाला, देवाच्या वचनाची मेजवानी घेत राहिले पाहिजे, आणि **वचनाला आमच्यामध्ये त्याचे कार्य करु दिले पाहिजे. ख्रिस्ताचा स्वभाव असणारे असे त्या वचनाचे शरीर आम्हामध्ये बनावे.** ठीक, दुसऱ्या एका गीताचा अर्थबोध असाच आहे. *'पृथ्वीच्या गोष्टींपासून स्वर्गीय गोष्टींकडे... त्याचे स्वरुप व त्याची प्रतिमा मजमध्ये पूर्ण करण्यासाठी गौरवाकडून गौरवाकडे तो माझे रुपांतर करीत आहे...'* प्रभूची स्तुति असो! आता प्रभूच्या शब्दांकडे लक्ष पुरवा.

> *'जे वचन मी तुम्हांस सांगितले त्यामुळे तुम्ही आता शुद्ध झालांच आहां. तुम्ही मजमध्ये राहा, आणि मी तुम्हामध्ये राहतो. जसे फाटा वेलात राहल्यावांचून त्याच्याने आपल्याआपण फळ देववत नाही तसे मजमध्ये राहिल्यावांचून तुम्हांलाही देतां येणार नाही. मी वेल आहे, तुम्ही फाटे आहां; जो मजमध्ये राहतो आणि मी त्याजमध्ये राहतो तो पुष्कळ फळ देतो, कारण मजपासून वेगळे असल्यास तुम्हाला कांही करता येत नाही. कोणी मजमध्ये राहिला नाही तर त्याला फाट्याप्रमाणे बाहेर टाकितात, व तो वाळून जातो, मग त्यांस गोळा करुन अग्नीत टाकितात व ते जळून जातात. तुम्ही मजमध्ये राहिला व माझी वचने तुम्हांमध्ये राहिली तर जे कांही तुम्हांस पाहिजे असेल ते मागा म्हणजे ते तुम्हास प्राप्त होईल.'*
>
> - योहान १५:३-७.

## आरसा

आपण आपली प्रतिमा निरखण्यासाठी ज्याप्रमाणे दररोज आरशासमोर येतो त्याप्रमाणेच देवाच्या वचनाच्या अगदी समोर-तोंडोतोंड येण्याची आम्हास कधीच लाज वाटूं नये.

*'कारण या व्यभिचारी व पापी पिढीमध्ये जो कोणी माझ्या विषयींची व माझ्या वचनांविषयींची लाज धरील त्याच्याविषयींची लाज मनुष्याचा पुत्रहि, जेव्हां तो पवित्र दूतांसुद्धां आपल्या बापाच्या गौरवात येईल, तेव्हां धरील.'*

मार्क ८:३८ (रमाबाईचे भाषांतर).

आम्ही आपल्या मुखाने त्या जीवनाच्या शब्दाची साक्ष द्यावी की ते वचन आम्हामध्ये असून आम्ही आमच्या जीवनांत, त्याचे प्रतिबिंब पाडीत आहोत. आम्ही आरशात पाहतो तेव्हा आम्हाला आमची प्रतिमा (प्रतिबिंब) दिसते. हे आम्ही कांही विशिष्ट हेतूने करीत असतो. आमची शारीरिक प्रतिमा आम्हाला महत्वाची वाटते म्हणून आम्हाला आरशात जे चुकीचे, अयोग्य किंवा खटकणारे दिसते त्यानुसार आम्ही ते दुरुस्त (नीटनेटके) करतो. आमच्या तोंडावरील घाण व घाणीचे पुसट डाग धुवून स्वच्छ करण्याव्यतिरिक्त आमच्या मते आमची प्रतिमा कशी आहे ती सादर करण्याची आमची इच्छा असते. जग आमच्या आध्यात्मिक प्रतिमेकडे पहात असते, त्या प्रतिमेच्या बाबतीतही हे सत्य आहे. देवाच्या पवित्र वचनाच्या **आरशाकडे** येत असतांना आमचा चेहरा उघडा हवा; आच्छादलेला नसावा, पवित्र आत्म्याने मार्गदर्शन करुन आम्हाला **वचनात** चालवावे अशी आमची इच्छा असली पाहिजें यासाठी की ख्रिस्त येशू जो आमचा प्रभु त्याच्या प्रतिमेशी जुळते मिळते होण्यासाठी त्याने आम्हांस धूवून स्वच्छ करावे. आम्ही अजून अपात्र आहोत असे आम्ही कधीच म्हणू नये किंवा आम्हाला तसे वाटू नये. एकदा आम्ही अपात्र होतो कारण आम्ही पापी होतो व देवाच्या न्यायाला तोंड देत होतो. परंतु येशू आम्हाला सोडवण्यासाठी आला आणि त्याच्या कृपेने आमचे जीवन पुन्हा लिहिले गेले. आमच्याऐवजी त्याने सर्व भरपाई केली, आणि आता आम्ही त्याच्या दृष्टीने योग्य आहोत. *'यावरुन जे ख्रिस्त येशूमध्ये आहेत त्यांस आतां दंडाज्ञा नाही.'* रोम ८:१. म्हणून, देव आमच्यावर प्रीति करुन आमची काळजी घेतो हे जाणून आपण त्याच्याकडे संपूर्ण आदराने व भयाने येऊ या.

*'तर आपण सर्व आच्छादन नसलेल्या तोंडाने प्रभूचे गौरव आरशात पाहिल्याप्रमाणे पाहत असता, प्रभु जो आत्मा याच्याकडून गौरवापासून गौरवात असे त्याच्या प्रतिरुपात पालटले जातो.'*

- २ करिंथ ३:१८ रमाबाईंचे भाषांतर

## मनाचे नवीकरण

फुलपाखरु-अळी किंवा सुरवंट ह्या स्वरुपात तो छोटासा जीव आपल्या शरीरावर येणाऱ्या त्या गौरवी दिवसाकरता दररोज स्वतःची तयारी करीत राहतो. (मत्तय

२४:४४ प्रकटी १९:७) प्रेषित पौलाने लिहिल्याप्रमाणे : *'... असे की तुमच्या पूर्वीच्या आचरणासंबंधी जो जुना मनुष्य त्याचा तुम्ही त्याग करावा, तो कपटाच्या वासनांनी युक्त असून त्याचा नाश होणार आहे. तर तुम्ही आपल्या मनोवृत्तीत नवे व्हावे, आणि धार्मिकता व सत्याची पवित्रता यांनी युक्त असा देवानुरुप उत्पन्न केलेला नवा मनुष्य धारण करावा.'* इफिस ४:२२-२४, म्हणून प्रियांनो, आपण प्रेषित पौलाच्या शब्दांकडे लक्ष पुरवू या, आणि देवाच्या करुणांमुळे, आपल्या शरीरांचा जीवंत, पवित्र व देवाला प्रिय असा यज्ञ अर्पण करु या. ही आपली आध्यात्मिक सेवा आहे. देवाची स्तुति असो, त्याने यापेक्षा अधिक असे कांही मागितले नाही. आणि आपण सैतानप्रणीत धार्मिक (?) आणि ह्या वाईट जगाच्या मोहक चालीरीतींच्या दर्जाशी समरुप न होता आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वतःचे रुपांतर होऊ देऊ - विचार, भावना व इच्छांचे रुपांतर - यासाठी की देवाची जी उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे ते आपण समजून घ्यावे. (तुलना-रोम १२:१-२)


ख्रिस्ताच्या आत्म्याने आपण आपल्या मनाचे नवीकरण करीत असता आपण सैतानाच्या आत्म्याला खोटे म्हणू शकतो व त्यावर विजय मिळवू शकतो. शत्रूंविरुद्ध आपली जी दैनिक लढाई जिच्याकडून ते (शत्रू) आपणास ह्या जगांतील पापांत गुंतवून व जखडून टाकतात, त्यातून आपली सुटका करण्यासाठी व विजय देण्यासाठी आपल्या हृदयरुपी किल्ल्यामध्ये वास करणारा ख्रिस्ताचा आत्मा आपल्या सहाय्यार्थ धावून येईल. आपण पृथ्वीवरील गोष्टींकडेच लक्ष लावावे आणि आपला नाश घडवून आणावा म्हणून सैतान आपल्या 'जुन्या मनुष्याचे' मन आपल्यात पुन्हा घालण्यासाठी जारीने प्रयत्न करील. परंतु जोपर्यंत *आपले नागरिकत्व तर स्वर्गीय आहे तेथून प्रभू येशू ख्रिस्त हा तारणारा असा येईल, याची आपण वाट पहातो; ज्या सामर्थ्याने तो सर्वच आपल्या स्वाधीन करावयास समर्थ आहे त्या सामर्थ्याने तो तुमचे आमचे नीचावस्थेतील शरीर स्वतःच्या गौरवावस्थेतील शरीरासारखे व्हावे म्हणून त्याचे रुपांतर करील.'* (फिलिप्पै ३:२०-२१), तोपर्यंत सैतानाला ते साध्य करता येणे शक्य होणार नाही. आमेन.

आत्म्याच्या आणि देवाच्या वचनाच्या पवित्र गाभाऱ्यात प्रवेश करुन आपण आपल्या अंतःकरणात हे गीत गाऊ या :

*मुक्त ऐस विमलात्म्या, तव प्रीतिसंगमगृही*
*करिता तू बंद दारा, लडिवाळे कुजबुज मजशी*
*स्वर्गीय प्रेमिका, तव समक्षता घालो पाखर मजवरी*
*मी सतत इच्छा करी तव अविरत प्रकाश गौरवी.*
*ये मम प्रिया, हो मम प्रभु, मम धनी*
*शरण तुजशी येता, करी मज एक तुजशी*
*तव मंगल वचन हे मम अंगवस्त्र*
*होवो ते मम समर्थन, पाखर नी अस्त्र.*

# शांतता - विश्रांती आणि संजीवन

वेळ जात राहतो किंवा व्यतित होत असतो. फुलपाखराचा तो अळीरुपी सुरवंट आता **प्रौढ** अवस्थेत आलेला असतो. आपले रुपांतर होण्याच्या **पूर्णत्व व गौरव** अवस्थेच्या आणखी एका टप्प्यात तो येऊन पोचलेला असतो, ज्यामध्ये तो आता 'विश्रांती' आणि त्याच्या त्या हर्षाच्या दिवसाच्या किंचित अगोदर 'संपूर्ण संजीवन' अशा अवस्थेत तो येतो. तो **वरच्या पातळीवर** चढत चढत जातो. होय, त्याला हे प्रगट झालेले असते की, 'लोक मोठ्याला बोलवित आहे.'' ज्यावेळी तो पृथ्वीच्या बंधन स्थितीतून पूर्ण स्वतंत्र होईल. तो गौरवाच्या एका अवस्थेतून रुपांतराच्या दिशेने दुसऱ्या अवस्थेत बदलत राहतो. आमेन. त्या सुरवंटाच्या पुनर्जन्माच्या प्रक्रियेपासून आतापर्यंत त्याने जी कोवळी लुसलुशीत 'हिरवी' पाने खाल्लेली असतात त्यांचे पचन झालेले असते व त्याचे सुपरिणाम त्याच्या शरीरात घडत असतात. त्यात सतत वाढत जाणाऱ्या वैभवाचा समावेश असतो. आता हिरव्या द्रव्यातील जीवन त्याच्या तोंडातून बाहेर येते व त्याच्या शरीराभोवती एका विशिष्ट **आवरणाची** तरतूद करते. (तुलना-लूक ६:४५, इयोब २९:१४) ते आवरण किंवा आच्छादन **संरक्षण** आणि **सुरक्षितता** सुद्धा पुरवते. आता तें (होऊ घातलेले फुलपाखरु) सुरवंट कोषामध्ये आहे. तेथून पुढे ते कांही खात नाही. ते आपल्या 'विश्रामस्थानी' आलेले आहे. फुलपाखराचा तो कोष दिसायला **शांत-निवांत दिसतो. परंतु त्याच्या बदलाच्या किंवा रुपांतराच्या अंतिम अवस्थेपूर्वी त्याच्यामध्ये 'संजीवनाची' प्रक्रिया चालू असते.** प्रभूचा धन्यवाद होवो! हालेलूया!




संतजनहो, फुलपाखरू सुरवंट हे फुलपाखरु-सुरवंटच असते. भले त्याचे वय कांहीहि असो. **परंतु त्या सुरवंटाने त्याच्या शरीरात पुरेशा हिरव्यागार अन्नाचे सेवन करुन ते पचवले नाही तर ते ह्या प्रौढाअवस्थेत कधीच पोचणार नाही.** वास्तविक पाहता, तसे न केल्यास तो सुरवंट मरुन जाईल. (तुलना-योहान ५:३९-४०, ६:५३) म्हणून हे लक्षात ठेवा की जर तुम्ही **देवाच्या वचनाचे सतत सेवन करुन त्याद्वारे जगत नसाल तर गौरवाच्या ह्या अवस्थेपर्यंत तुम्ही कधीच येणार नाही.** याचाच अर्थ जर तुम्ही वचनावर व त्याच्या प्रकटीकरणावर विश्वास ठेवित नसाल किंवा ठेवू शकत नसाल तर बदल होण्यासाठी तुम्ही **'पोक्त'** किंवा **प्रौढ** नाहीत. जर तुम्ही ते स्वीकारु शकत असाल तर तुम्ही त्याच्या प्रकाशात चाललेचं पाहिजे. आमेन. त्यासाठी दुसरा पर्याय नाही.

संतजनहो, आत्म्याने भरलेले लोक ह्या नात्याने आपणांस ख्रिस्तामध्ये आपली 'विश्रांती' प्राप्त झाली आहे. (इब्री. अध्याय ४) तसेच **देवाच्या स्वर्गारोहणाच्या पांच प्रकारच्या सेवेद्वारे** ह्या घडीसाठी असणाऱ्या देवाच्या वचनरुपी मेजवानीद्वारे आपणांस ते 'संजीवनहि' मिळाले आहे. (इफिस ४:४-१६) आध्यात्मिक वचनाची नियमित मेजवानी व पचनक्रिया व *'ख्रिस्त येशूमध्ये देवाचे जे वरील पाचारण त्यासंबंधीचा*

*पण जिंकण्यासाठी मर्यादेवरील खुणेकडे धावतो'* (फिलीपै ३:१४). याकडून त्याच्या प्रतिमेत सतत वाढत जाणाऱ्या गौरवात रुपांतर होत आहे. रमाबाईच्या भाषांतरात हे अधिक सुस्पष्ट दिसते. *'... प्रभु जो आत्मा याच्याकडूनच गौरवापासून गौरवात असे त्याच्या प्रतिमेत पालटले जाते.'* (२ करिंथ ३:१८ ब) आमच्यामध्ये कार्य करणाऱ्या वचनाद्वारे ते आम्हांस आच्छादन, संरक्षण, सुरक्षितता पुरवते. तरिपण, ह्या सर्व प्रक्रियेचा अंतिम टप्पा गाठत असताना मोठया 'शांततेचा' एक अल्पसा कालावधि 'संपूर्ण संजिवनाचि विश्रांति' असतो. तो केव्हा व कशासाठी ? ख्रिस्त वधूला तिच्या अंतिम अवस्थेमध्ये घेऊन (उचलून) नेण्याच्या थोडेसे अगोदर म्हणजेच जेव्हा हे घडते तेव्हा 'सातव्या शिक्क्याचे' पूर्ण प्रकटीकरण आणले जाईल (प्रकटी ८:१) म्हणजेच प्रभु देव असे म्हणतो! प्रार्थनापूर्वक वाट पहावी आणि *'आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू याजकडे पहात असावे.'* (इब्री १२:२ अ) असे करण्याने वचनावर पोषण करणारे व वचनात चालणारे आपण ह्या 'विश्रांतीमध्ये' व 'संजीवनामध्ये' येऊ. त्या सात गर्जना त्यावेळी वावरु लागल्याबरोबर प्रेषित योहानाला पात्म बेटावर (प्रकटी १०:१-७) अगोदरच गर्जनांचे शब्द उच्चारुन ऐकवण्यात आलेला तोच संदेश रुपांतराच्या त्या अंतिम टप्प्यात ह्या सात गर्जनांद्वारे प्रकट केला जाईल. (योहान हा वधूचा नमुना आहे) प्रभूची स्तुति असो! **काळाची पूर्णता होईल तेव्हा जे शिक्का मारुन बंदिस्त केलेले व गुप्त ठेविलेले ते वधूला त्याच घटकेत तिच्या रुपांतरासाठी प्रकट केले जाईल.** म्हणून, आपण शांत राहून लक्षात ठेवू की प्रभु देव आहे आणि विदेशांमध्ये तो उंचावला जाईल, पृथ्वीभर त्याचा महिमा वाढेल. (स्तोत्र ४६:१०)

फुलपाखराच्या कोषाचे बारकाईने निरीक्षण करा. त्याच्या 'विश्रांतीकाळा' दरम्यान प्रत्येक दिवशी तेथे 'संजीवन' चालू असते. आणि 'विश्रांती' व संजीवनाबरोबर त्या कोषातून मुक्त होण्यासाठी कमालीच्या धडपडरुपी 'वेदना' कार्यरत असतात. त्या कोषांतर्गत जीवाला वेदना होण्यासाठी कांहीतरी कारणीभूत होत असते. ह्या अवस्थेत त्याला वारंवार झटका बसत असल्याचे तुमच्या निदर्शनास येईल. ते काय किंवा कशाचे दर्शक आहे? कोषामध्ये त्याच्या शरीरांतर्गत बरे होण्याची क्रिया सातत्याने चालू असते. ज्या ठिकाणी पंख हवेत त्या ठिकाणी पंख फुटून वाढू लागतात. स्तुति! आतमध्ये कण्हणे चालू असतांनाच वेदनांचा एक अद्‌भुत आनंद प्रत्ययास येत असतो. तो तो उद्‌घाटनाच्या दिवसाची त्याला ओढ लागलेली असते, म्हणजे शरीराच्या अंतिम बदलाचा किंवा रुपांतराचा तो उच्चांक किंवा सांगता असते. (तुलना - रोम ८:२३) वा! होलेलूया! नंतर अशीच एक भली पहाट संपून सुप्रभात होतेसमयी सूर्योदय होवून उबदार सूर्यकिरणे त्या कोषावर आदळतील तेव्हा तो कोष वेदनाकारक आनंदाचा अखेरचा झटका देईल. त्यावेळी त्याचे ते आच्छादन कल्कन् उकलले जाईल आणि एक सुंदर मुलायम पंखधारी जीवन-**फुलपाखरु** त्यातून बाहेर पडेल.

प्रभूची स्तुति असो! सध्याच्या घडीतील अशाच एके दिवशी जेव्हा वधूची **त्रोटक परंतु सुरम्य 'विश्रांती'** संपेल तेव्हा प्रभूच्या पवित्र आत्म्याच्या त्या

## गौरवापासून गौरवात

कोषासमान गृहात असे काही **महान 'संजीवन'** कार्यवाहित येईल की ते वचनाच्या सान्निध्यात वधूच्या वेदनांस कारणीभूत ठरेल. तेथे अवतरते दैवी प्रीति! आणि प्रभु येशूचे हे शब्द : *'त्या दिवशी तुम्हांस समजेल की मी आपल्या पित्यामध्ये, तुम्ही मजमध्ये व मी तुम्हांमध्ये आहे.'* (योहान १४:२०) त्याची आपणामध्ये (वधूमध्ये) परिपूर्ण रीतीने सांगता होईल. **''म्हणजेच आम्ही आमच्या दत्तकपणाची तथा आमच्या शरीराच्या मुक्तीची वाट पहात''** (रोम ८:२३) असता ती पूर्णता अवतरेल. कळसाचा चिरा मुख्य कोनशिला, मुख्य दगड वधु-पत्नीच्या सांगतेसाठी आला आहे. होय, वधूसाठी असणारी ती थोडी 'विश्रांती' व 'संजीवन' साधारण ४० दिवसाइतक्या अल्पकाळासाठी टिकतील. (तुलना प्रेषित १:३) म्हणजेच प्रभूच्या संतांसाठी त्या सात गर्जना, आपल्या संदेशाचे शेवटचे प्रकटीकरण देण्यासाठी येतील तेव्हा त्या त्या संदर्भातील तो अल्पावधि सुमारे ४० दिवसांचा असेल. सातव्या शिक्क्यातील महान 'निवांत-समय' तो हाच. येशू ख्रिस्ताच्या (मंडळीरुपी) शरीराच्या **'पूर्ण बरे होण्याची'** घटका हीच असेल. त्यावेळी त्रासलेले व विकलांग असे जे व्यक्तिगत संतजन जीवंत असतील ते **देवाच्या बोललेल्या शब्दाच्या प्रकटीकरणाद्वारे पूर्णपणे यथास्थित केले जातील.** त्यावेळी ज्यांना हात नसतील, त्यांना त्या जागी हात येतील, ज्यांचे एकदा डोळे गेले व त्यानंतर त्यांनी कांहीच पाहिले नाही अशांचे डोळे यथास्थित केले जातील. **गौरवांत बदलून जाण्यापूर्वी संतांची शरीरे पूर्णपणे यथास्थित केली जातील.** हालेलूया! काय ते शब्दातीत 'संजीवन' असेल! आणि ते जगापासून अलिप्त (गुप्त) ठेवलेले आहे. आमेन.



नंतर एका दिव्य वैभवी अशा प्रभातकाळी सूर्योदय होतेसमयी (साधारण ६ वाजण्याच्या सुमारास) वधूचे **शब्दशरीर किंवा स्वर्गीय शरीर** हे देवाचा जो स्वर्गीय शब्द त्याच्यापासून खाली उतरेल आणि तिला (वधूला) गुंडाळून घेईल. तिच्यामधील तो गौरवी शब्द, म्हणजेच तिचे आच्छादन, सुरक्षितता व संरक्षण ही तिच्यामधून उत्स्फूर्तपणे बाहेर धाव घेतील-झेपावतील आणि *'क्षणात, निमिषांत, शेवटल्या करण्याच्या वेळेस, कारण करणा वाजेल, मेलेले ते अविनाशी असे*

*उठवले जातील, आणि आपण बदलून जाऊ. कारण हे जे विनाशी त्याने अविनाशीपण परिधान करावे, आणि हे जे मर्त्य त्याने अमरत्व परिधान करावे हे आवश्यक आहे, हे जे विनाशी त्याने अविनाशीपण परिधान केले, आणि हे जे मर्त्य त्याने अमरत्व परिधान केले, असे जेव्हा होईल तेव्हा मरण विजयात ग्रासले गेले आहे, असा जो शास्त्रलेख तो पूर्ण होईल. अरे मरणा, तुझा विजय कोठे? अरे मरणा, तुझी नांगी कोठे?* (१ करिंथ १५:५२-५५) हालेलूया! रक्त आणि मांस ही गौरवी आध्यात्मिक शरीराला वाट करुन देतील.

## घराकडे भरारी

सुंदरसे फुलपाखरु आपले पंख फडफडविते आणि वाऱ्यांबरोबर भरारी मारुन स्वर्ग गाठते. काय ते त्याच्या व्यक्तिमत्वामध्ये चितारलेले नाजुक मिश्रणाचे मनमोहक रंग! एकदा त्याची जी अवस्था होती तिच्याशी तुलना करता काय हा सुंदरसा पक्षी, जीव! एका फुलावरुन दुसऱ्या फुलाभोवती पिंगा घालत वाऱ्यावर स्वार होवून ते जात असतांना पाहणे म्हणजे डोळ्यांचे पारणेच फिटते. ते आता एकाद्या **बंधनातहि नाही आणि एका जागेशी बंदिस्तहि नाही.** आता त्याला मुक्त करण्यात आले आहे! ते स्वतंत्र आहे!! संपूर्ण स्वातंत्र्य!!! आणि एक लक्षात घ्या. तेथूनपुढे त्याला आता हिरवे खाद्य खाण्याची गरज नाही. **त्याचे खाद्य निराळे आहे.** काहीतरी खास, विशेष व वेगळे असे ते खाद्य आहे. मान्ना? तर काय? देवाने निर्माण केलेल्या आकर्षक फुलांतील सुंदर, गोड मध! अमृत!

अगदी त्याचप्रमाणे ख्रिस्ताची निवडलेली सद्‌गुणसंपन्न स्त्री वैभवी दिव्य सुंदर शरीरात उड्डाण करील, कोठे? स्वर्गीय पित्याच्या घरात, कोकऱ्याच्या भव्य मेजवानींसाठी. आता मांस व रक्त यांनी ती खाली न खेचली जाता ख्रिस्ताच्या आत्म्याच्या गौरवी स्वातंत्र्यात ती स्वर्गाकडे उड्डाण करील. पाहणाऱ्या सर्वांच्या नजरांचे पारणे फेडणारी अशी ती सौंदर्यवती असेल, हे खास. स्वर्गात ती आपल्या राजाजवळ बसून हजारो मैल लांब अशा टेबलाशी बसून ती त्या मोठ्या मेजवानीचा अस्वाद घेताना हे विलोभनीय दृश्य न्याहळणारे कोण असतील, तर ते दूतगण होत. आणि ख्रिस्ताच्या एक हजार वर्षांच्या राज्याच्या कालादरम्यान पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे व प्राणीजात 'देवाच्या पुत्रांच्या प्रकट होण्याचा' हा देखावा निरखतील. कधी? ख्रिस्ताबरोबर त्याची ती (वधू) पत्नी राज्य करीत असतांना. (रोम ८:१९) लिखित शब्द (पवित्र शास्त्र) हे तेथून पुढे तिचे खाद्य नसणार, कारण त्यापेक्षा कांहीतरी खास-विशेष अशावर तिचे पोषण होत राहील. मान्ना? कोणत्या प्रकारचा? तो स्वर्गीय मान्ना आहे जो प्रत्यक्षात जीवंत देवाच्या तेजःपुंज राजासनातून वहात असतो! धन्य, धन्य! हालेलूया!

संतजनहो, पृथ्वीच्या स्थापनेपूर्वी देवाने जे नेमस्त केले होते ते पूर्णत्वास आणण्यास तो समर्थ आहे. त्याचे वचन तुमची बांधणी व वृद्धि करुन ख्रिस्तामध्ये असणारे ते वचन तुम्हाला बहाल करण्यास समर्थ आहे. प्रेषित पौलाने लिहिलेल्या वचनावर विश्वास ठेवा :

'कारण ज्यांच्याविषयीचे त्याला पूर्वज्ञान होते त्यांनी आपल्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे म्हणून त्याने त्यांना आगाऊच नेमून टाकिले; ह्यात हेतु हा की बंधुवर्गात त्याने ज्येष्ठ असे व्हावे.'

- रोम ८:२९

'तसे त्याने आपल्या इच्छेच्या संतोषाप्रमाणे आम्हांला येशू ख्रिस्ताकडून मुलांचा पूर्ण हक्क देण्यासाठी आम्हांला पूर्वी नेमले, आपल्या कृपेच्या गौरवाची स्तुति व्हावी म्हणून त्याने आम्हांस त्या कृपेने त्या प्रियामध्ये असे केले.'

- इफिस १:५-६-रमाबाईचे भाषांतर

शेवटी, माझ्या बंधुजनांनो, आपल्या प्रभूच्या उद्‌बोधक शब्दाकडे लक्ष देऊन हर्ष करा :

'आपले धैर्य सोडू नका, त्यापासून मोठे प्रतिफळ आहे. तुम्हांस सहनतेचे अगत्य आहे, यासाठी की तुम्ही देवाच्या इच्छेप्रमाणे वागून वचनफळ प्राप्त करून घ्यावे. कारण अगदी थोडा वेळ राहिला आहे, जो येणार तो येईल, उशीर करणार नाही.'


- इब्री १०:३५-३७

'तर आपण आपल्या इतक्या साक्षीरुपी मेघाने वेढिलेले आहो म्हणून आपणहि सर्व दडपण व सहज गुंतविणारे पाप टाकून, आपल्याला नेमून दिलेल्या धावेवरुन धीराने धावावे, आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू याजकडे पाहत असावे.'

- इब्री. १२:१-२अ

'अहो बंधूनों, प्रभूच्या आगमनापर्यंत धीर धरा. पाहा, शेतकरी भूमीच्या मोलवान् पिकाची वाट पाहत असतां, त्यास 'पहिला व शेवटला पाऊस' मिळेपर्यंत त्याविषयी. तो धीर धरितो, तुम्हीहि धीर धरा, आपली अंतःकरणे स्थिर करा, कारण प्रभूचे आगमन जवळ आले आहे.'

- याकोब ५:७-८



छोट्या गरुड-पिलांनो,
आपले पंख पसरा,
आणि उडा !

याच लेखकाची इतर पुस्तके - साठा असेपर्यंत विनंतीवरुन विनामूल्य मिळतील

लोगॉस : देवाच्या सृष्टीचे आदिकारण - देवत्वाचे प्रकटीकरण

तुम्ही देवाला मागे टाकू शकत नाही. दान देण्याच्याबाबतीत शिकवण.

कोकऱ्याचे लग्न - ख्रिस्ताचे त्याच्या मंडळीसाठी येणे.

गौरवापासून गौरवांत - आमचे रुपांतर (मेटॉमॉर्फोसिस)